




रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ४१
www.ramprahar.com

मंगळवार, २७ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


जलप्रदूषणाने सावित्री, काळ नदीतील मासे मृत्युमुखी/२

गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांची दहीहंडी जल्लोषात/६

रायगडच्या कराटेपटूंनी जिंकली चॅम्पियनशीप ट्रॉफी/८


# मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करा

## मुख्यमंत्र्यांचे यंत्रणांना निर्देश; गणेशोत्सवापूर्वी वाहतूक सुरळीत करण्यासाठी पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. २६) मुंबई-गोवा महामार्गावर सुरू असलेल्या कामांची भर पावसात पाहणी केली. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना जो काही त्रास होतोय तो होऊ नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा. गणेशोत्सवापूर्वी हा महामार्ग खड्डेमुक्त करून वाहतूक सुरळीत करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी संबंधित यंत्रणांना दिले.



मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाहणी दौऱ्याला पनवेलमधील पळस्पे येथून सुरुवात झाली. मुख्यमंत्र्यांसमवेत खासदार श्रीरंग बारणे, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, आमदार भरत गोगावले, आमदार रविशेठ पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे परेश पाटील, रामदास शेवाळे आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात झाली आहे. पहिली टेक्नॉलॉजी एम ६० आरएफसी आणि लिओ पॉलिमर पद्धत, दुसरी रॅपिडेक्स हार्डनर एम ६० पद्धत आणि तिसरी डीएलसी पद्धत. या तीन आधुनिक पद्धतींनी रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे चौथी पद्धत ब्रिक्स कास्ट एम ६० ही पद्धत. या पद्धतीमध्ये सिमेंटच्या तयार प्लेट्स बसवून रस्ता तयार करण्यात येत आहे. या माध्यमातून महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी संपूर्ण टीम काम करीत आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी स्वतः या कामावर लक्ष ठेवून आहेत तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनीही लक्ष घातले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

जे जुने कंत्राटदार काम सोडून पळाले आहेत, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले.

# रायगडातही आज गोपाळकाल्याची धूम

## 'लाख'मोलाची बक्षिसे जिंकण्यासाठी गोविंदा पथके सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सोमवारी भगवान श्रीकृष्णाची जन्माष्टमी साजरी झाल्यानंतर मंगळवारी (दि. २७) गोविंदा रे गोपाळाच्या घोषात दहीहंडी उत्सव साजरा होणार आहे. दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकांना लाखो रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. यासाठी पथके सज्ज झाली आहेत.

रायगड जिल्ह्यात यंदा मोठमोठ्या बक्षिसांच्या दहीहंड्या उभारण्यात येणार आहेत. पनवेल तालुक्यातील उलवे नोड सेक्टर ९मधील खारकोपर तलावाच्या बाजूला असलेल्या मैदानात भारतीय जनता पक्ष आणि महिला मोर्चा उलवे नोड यांच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य दहीहंडी उत्सव साजरा होणार आहे. या उत्सवाचे सायंकाळी ४ ते १० वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले असून सहा लाख ६६ हजार ६६६ रुपयांची एकूण बक्षिसे दिली जाणार आहेत. महिलांसाठीही खास आकर्षक दहीहंडीही असणार आहे. या वेळी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. त्याचबरोबर पनवेल शहर भाजपतर्फे आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत आमदार चषक दहीहंडी उत्सव रंगणार आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे होणाऱ्या या दहीहंडी उत्सवात एकूण पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांची बक्षिसे आहेत. याशिवाय साईतेज प्रतिष्ठानच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन पनवेल सेक्टर १४मधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेज येथे भव्य दहीहंडी उत्सव आयोजित केला गेला आहे. या ठिकाणी सात लाख ७७ हजार ७७७ रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. आशिष नाईक मित्र मंडळाच्या वतीने तक्का येथील संत सावळा माळी हॉलजवळ दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय इतर ठिकाणीही दहीहंडी उत्सव होणार आहे.



अलिबाग तालुका आणि शहर भाजपने अलिबागमधील त्यांच्या कार्यालयासमोर दहीहंडी प्रायोजित केली आहे. दोन लाख २२ हजार २२२ रुपये आणि चषक देऊन विजेत्या गोविंदा पथकाला सन्मानित करण्यात येणार आहे. (पान २ वर..)



**पनवेल : भाजपचे नवनिर्वाचित राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी सोमवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी खासदार धैर्यशील पाटील यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस अमरीश मोकल, अभिषेक पटवर्धन यांच्यासह खासदार पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते.**






## मालवणमधील शिवरायांचा पुतळा कोसळला


**मालवण : प्रतिनिधी**

नौदल दिनानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला आहे. ४ डिसेंबर २०२३ रोजी या शिवपुतळ्याचे लोकार्पण झाले होते.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, ही घटना घडली तेव्हा या भागात ४५ किमी प्रतितास इतक्या वेगाने सोसाट्याचा वारा वाहत होता. त्यामुळे पुतळ्याचे नुकसान झाले. मी सर्वांना आश्वस्त करू इच्छितो की, उद्या तिथे नौदलाचे अधिकारी जाणार आहेत. पालकमंत्री रवींद्र चव्हाण घटनास्थळी पोहचलेत. उद्यापासूनच शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा पुन्हा उभारणीच्या कामाला सुरुवात केली जाईल.

## खासदार वसंत चव्हाण यांचे निधन

**नांदेड** : येथील खासदार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत चव्हाण यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैदराबाद येथील किम्स रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान सोमवारी (दि. २६) पहाटे ४च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.




# आदिवासीपाड्यांचे आदर्श गावांमध्ये रुपांतर करावे -राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचा विकास साधण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. आदिवासी बांधवांपर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे. त्यांना पायाभूत सुविधा आणि उत्तम सेवा देऊन आदिवासी पाड्यांचे आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे निर्देश राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.



आदिवासी जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर आदर्श आदिवासी गाव बनविणे आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.२६) राजभवन येथे बैठक झाली.

बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वनविभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार यादव, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, आदिवासी विकास आयुक्त नैना गुंडे, आदिवासी विकास वित्त महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, आदिवासी संशोधन, प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रवीण दराडे, पद्मश्री पोपटराव पवार, विविध विभागाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, या गावांमध्ये रस्ते, शुद्ध पिण्याचे पाणी, पायाभूत सुविधा, वैद्यकीय सुविधा, दर्जेदार शिक्षण, शाश्वत कृषी विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे. ही आदर्श गावे ज्ञानाच्या देवाणघेवाणीला चालना देण्याबरोबरच आदिवासी बांधवांच्या सबलीकरणाबरोबरच आत्मविश्वास वाढवताना मानक म्हणून काम करतील. आदिवासी बांधवांच्या सामाजिक व सांस्कृतिक उत्थानासाठी प्रयत्न न करता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विशेषतः आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उत्तम शाळा सुरू करून दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या विद्यार्थ्यांसाठी 'के जी टू पी जी'पर्यंतचे उत्तम शिक्षण देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रस्तावित आदिवासी विद्यापीठांमध्ये अधिकाधिक राखीव जागा देऊन आदिवासी विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.

# जलप्रदूषणाने सावित्री, काळ नदीतील मासे मृत्युमुखी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील विविध रासायनिक कारखान्यांच्या प्रदूषणामुळे सावित्री व काळ नदीमध्ये गेल्या १५ दिवसांपासून लाखो मासे मृत्युमुखी पडले आहेत. यामुळे मच्छिमार बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने अशा कारखान्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरीत आहे.



महाड औद्योगिक वसाहतीतील घातक रासायनिक सांडपाणी थेट सावित्री नदीपात्रात रात्रीच्या वेळी सोडण्यात आल्याने मागील १५ दिवसांपासून सावित्री नदी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाली आहे. परिणामी नदीतील लाखो मासे मृत होऊन तरंगत आहेत. याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कारवाई करण्यात चालढकल करीत आहे.

सावित्री नदीत रासायनिक सांडपाणी सोडल्याने नदीतील पाण्याचा रंग पूर्णपणे लाल झाला असून हजारो टन मासे मृत्युमुखी पडून तरंगू लागले आहेत. अशी वस्तूस्थिती निदर्शनास आणून नदीपात्रालगतच्या पारंपरिक मच्छिमारी करणाऱ्या भोई समाजाला ऐन सणासुदीच्या दिवसांत उपासमारीची वेळ ओढावल्याने भोई समाजाला प्रदूषण नियंत्रण महामंडळ व सीईटीपीने आर्थिक नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा भोई समाज महाड औद्योगिक वसाहतीतील सीईटीपीच्या कार्यालयाजवळ धरणे आंदोलन करेल, असा इशारा दासगावमधील भोई समाजाचे नेते पांडुरंग सूर्यकांत निवाते यांनी दिला आहे.

# सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलांतील १०० दुकानांची विक्री योजना

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सिडकोच्या बामणडोंगरी येथील गृहसंकुलांतील १०० उपलब्ध दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली आहे. ३० ऑगस्टपासून योजनेच्या ऑनलाईन अर्ज नोंदणीस प्रारंभ होणार आहे. या योजनेंतर्गत वेगाने विकसित होत असलेल्या उलवे नोडमध्ये आपला व्यवसाय वाढवण्याची संधी लहान व मध्यम व्यावसायिकांना लाभणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने राबविण्यात येत असलेल्या या योजनांद्वारे सर्वसामान्य नागरिक, विकासक, व्यावसायिक, अशा विविध घटकांना लाभ होऊन शहराचा सर्वांगीण विकास होण्यासही हातभार लागतो.

या योजनेंतर्गत सिडकोतर्फे बामणडोंगरी गृहसंकुल, सेक्टर-६, उलवे येथील २४३पैकी १०० दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उलवे नोड हा सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण नोड आहे. उलवे परिसराला रेल्वे, रस्ते आणि सिडको मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. या दुकानांपासून सिडकोचा महत्त्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पही नजीकच्या अंतरावर आहे. यामुळे उलवे नोडला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.

योजनेच्या ऑनलाईन नोंदणीस ३० ऑगस्टपासून प्रारंभ होणार असून ई-लिलाव तथा ई-निविदा प्रक्रियेद्वारे दुकानांची विक्री करण्यात येणार आहे.

# जिल्हा रुग्णालयात नेत्रदान पंधरवड्याचा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा शासकीय रुग्णालयात २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीमध्ये साजरा होणारा ३९व्या राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्याचा शुभारंभ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी-घुगे यांच्या हस्ते झाला.




या वेळी रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. संगमेश्वर महाजन, राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, नेत्रशल्यचिकित्सक डॉ. अजय इंगळे, अधिसेविका गायत्री म्हात्रे, सहाय्यक अधिसेविका अनिता भोपी, परिसेविका मालती मोकल, सुविधा दवटे, स्मिता जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जोशी म्हणाल्या की, नेत्रदान करून दोन अंध व्यक्तीस दृष्टी देण्यास मदत करावी, असे आवाहन केले. नेत्रशल्यचिकित्सक डॉ. अजय इंगळे यांनी विभागाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेची माहिती दिली. डॉ. संगमेश्वर महाजन तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नेत्रदान समुपदेशक अक्षय गोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लेखापाल रुपेश म्हात्रे, अधिपरिचारिका मनीषा गावंड, कविता गोळे आदींनी सहकार्य केले.

# गुजरातमध्ये पुराचा हाहाकार

## मध्य प्रदेश, महाराष्ट्रातही अलर्ट जारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात पुन्हा एकदा पावसाने धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाने मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरातसह महाराष्ट्रातही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अशातच गुजरातमधील अनेक जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अहमदाबादमध्ये पहाटे तीन वाजल्यापासून पाऊस सुरू असून शहरातही पाणी भरले आहे.

अहमदाबादच्या अनेक भागात सात फुटांवर पाणी भरले आहे. गुजरातच्या २३ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याचबरोबर मध्य प्रदेशच्या नीचम, उज्जैन, मंदसौर, रतलामसह आठ जिल्ह्यांत पुढील २४ तासांत पूर येण्याचा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानमध्ये पाच जिल्ह्यांना रेड अलर्ट आणि पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

# क्रांतिवीर फडके विद्यालयात विद्यार्थिनींना सुरक्षा प्रशिक्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिरढोण येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयात विद्यार्थिनींसाठी सुरक्षेबाबत शनिवारी (दि.२४) एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. जाणीव सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने आयोजित या शिबिरात जिमोलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ (अमेरिका) इंडिया लॅबोरेटरीच्या प्रतिनिधी मधुरा तायडे यांनी विद्यार्थिनींना सुरक्षा व स्वसंरक्षणाची माहिती व प्रशिक्षण दिले. विद्यालयाचे प्राचार्य शिवदास सूर्यवंशी व शिक्षागण उपस्थित होते.

या वेळी बोलताना मधुरा तायडे यांनी, शासनाबरोबरच आपल्या मुलांना पालकांनीही याबतीत माहिती दिली पाहिजे. शाळा, कॉलेजातून अशा प्रकारचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देऊन जनजागृती केली पाहिजे, अशा सूचना दिल्या.

इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन सत्रात पार पडलेल्या विद्यार्थिनी सुरक्षा शिबिरात चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श, स्वसंरक्षण तंत्र, संकट काळातील मानसिकता, सभोवतालची जाणीव, मासिक पाळी काळातील समस्या आणि उपाय, परस्परसंवादी चर्चा आणि प्रश्न-उत्तरे या मुद्द्यांवर प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी सिंड्रेस अर्मुगन, सेजल साळुंके आणि श्रुतिका तायडे यांनी सहकार्य केले.

# मुरूडमध्ये २७८ गोविंदा पथके दहीहंडीसाठी सज्ज



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरात कृष्णजयंतीचा उत्सव जोरदार साजरा केला जातो. २७८ गोविंदा पथके दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथक सज्ञ झाला आहे.

यामध्ये भंडारी समाजाची महिलांची दहीहंडी मुरूडमध्ये खास आकर्षण असून ही पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी पहायला मिळते. कृष्णजन्म काळाच्या सात दिवस आधीपासून प्रत्येक मंदिरात सप्ताह आयोलित केले जातात आणि आठव्या दिवशी रात्री १२.३० वाजता कृष्णजन्मोत्सव साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी भगवान श्रीकृष्णाची आरती करून दुपारच्या दरम्यान दहीहंडी फोडण्यासाठी गोविंद पथके येतात. बाजारपेठेत रंगीबेरंगी हंडी विक्रीकरिता दाखल झाली असून ग्राहकांची गर्दी दिसून येत होती.

# कृषी महाविद्यालयांमध्ये आभासी प्रयोगशाळा उभारणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषी महाविद्यालयांमध्ये आभासी प्रयोगशाळा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कृषी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना आभासी प्रयोगशाळेद्वारे बी-बियाणे, रोपे त्यांच्या विविध भागाचे निरीक्षण करणे व त्यावर संशोधन करण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर डिजीटल व स्मार्ट वर्गखोल्या आणि व्हिडीओ कॉन्फरन्स प्रणाली अद्ययावात करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०मध्ये ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षणावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करण्यासाठी डिजिटल व्यासपीठ, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) आधारित शैक्षणिक उपक्रमांचा समावेश करणे, डिजिटल पायाभूत सुविधा व आभासी प्रयोगशाळा स्थापन करणे, ऑनलाईन शिक्षणासाठी डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, ऑनलाईन अध्यापन व्यासपीठ आणि साधने निर्माण करून डिजिटल दरी कमी करणे, आभासी प्रयोगशाळा स्थापन करणे इत्यादी बाबींवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे. या बाबी लक्षात घेत राज्यातील चारही विद्यापीठांतर्गत असलेल्या सर्व कृषी महाविद्यालयांमध्ये आभासी प्रयोगशाळा स्थापन करण्याबरोबरच डिजिटल, स्मार्ट वर्गखोल्या आणि व्हिडिओ कॉन्फरन्स प्रणाली अद्ययावात करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने चारही कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयांसाठी सादर केलेल्या प्रस्तावाला सरकारने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

राहुरी कृषी विद्यापीठासाठी १३ कोटी ३८ लाख ६९ हजार रुपये, परभणी कृषी विद्यापीठ १४ कोटी ९० लाख रुपये, अकोला कृषी विद्यापीठासाठी १४ कोटी ९० लाख रुपये व दापोली कृषी विद्यापीठासाठी १३ कोटी ९६ लाख ७५ हजार रुपये अशा एकूण ५७ कोटी १५ लाख ४४ हजार रुपये खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

पान १ वरुन

## रायगडातही आज गोपाळकाल्याची धूम

रोह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने या वर्षी दोन लाख २२ हजार २२२ रुपयांची दहीहंडी बांधण्यात येणार आहे. रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग येथे या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पेणकरांचे आकर्षण असलेली ललित पाटील मित्र मंडळाची दहीहंडी यंदाही होणार असून एक लाख ११ हजार ११ रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. या दहीहंडी उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात आठ हजार ५०९ दहीहंड्या उभारण्यात येणार आहेत. यामध्ये सहा हजार ६४१ खासगी, तर एक हजार ८६८ सार्वजनिक दहीहंड्यांचा समावेश आहे. उत्सवानिमित्त काही ठिकाणी सकाळी, तर काही ठिकाणी दुपारपासून मिरवणुका काढल्या जाणार आहेत. एकूण १७७ ठिकाणी पारंपरिक पद्धतीने मिरवणुका काढल्या जाणार असून या दिवशी मनोरंजनाचे कार्यक्रमही आयोजित केले आहेत.

दहीहंडी उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्ह्यात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांमधील अधिकारी कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त दंगल नियंत्रण पथके, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, पोलीस मुख्यालयातील पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत तसेच पोलिसांच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या सलग सुट्ट्या व पावसाळी पर्यटन हंगाम सुरू असल्याने मोठ्या संख्येने पर्यटकांनी जिल्ह्यात हजेरी लावली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. या चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.२५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २५७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ३६ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# गोपाळकाल्याच्या मुहूर्तावर ९०२ सदनिकांचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळातर्फे गोपाळकाल्याच्या मुहूर्तावर सोमवारी (दि.२६) नवी मुंबईतील गृहसंकुलातील एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. एकूण ९०२ सदनिकांपैकी नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील २१३ आणि सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती व वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या गोपाळकाल्याच्या मुहूर्तावर उपलब्ध ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत कळंबोली, खारघर आणि घणसोली नोडमधील उपलब्ध २१३ सदनिकांपैकी ३८ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि १७५ सदनिका या सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. तसेच सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती आणि वास्तुविहा-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील उपलब्ध ६८९ सदनिकांपैकी ४२ सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता, ३५९ सदनिका अल्प उत्पन्न गटाकरिता, १२८ सदनिका मध्यम उत्पन्न गटाकरिता आणि १६० सदनिका या उच्च उत्पन्न गटाकरिता उपलब्ध आहेत.

योजनेच्या ऑनलाईन अर्ज नोंदणीस २७ ऑगस्टपासून प्रारंभ होणार असून योजनेकरिता संगणकीय सोडत १० ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात येणार आहे. ऑनलाइन नोंदणीकरिता तसेच योजनेच्या सविस्तर माहितीकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.


## दुखवटा

### हरिहर मेहता



**माथेरान** : माथेरानमधील हरिहर रतिलाल मेहता यांचे वृद्धत्वाने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. प्रकृती बरी नसल्याने त्यांना पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. उमेदीच्या काळात त्यांनी विश्व हिंदू परिषदेचे शहर अध्यक्षपद भूषविले होते. माथेरान येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेत असंख्य माथेरानवासीय उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे.

### जगन्नाथराव कदम



**चौक** : कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतीमधील सर्वांत वयस्कर जगन्नाथराव कदम यांचे वयाच्या १०३ वर्षी निधन झाले. सातारा जिल्ह्यातील मूळ वेळे गावात ३७ वर्षे वास्तव्य करून कोयना धरणामुळे विस्थापित झाले. जनतेच्या अडीअडचणी सोडविणे, वारकरी पंथातील दिंडी, भजन, वार्षिक उत्सव यांच्यासह लग्नकार्यात उपस्थित राहून मंगलाष्टक बोलणे हा त्यांचा छंद होता. त्यांच्या पश्चात तीन विवाहीत मुले, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे.

# हिंदू समाज आता अन्याय सहन करणार नाही!

## खारघर येथे आक्रोश मोर्चात आमदार प्रशांत ठाकूर यांचा इशारा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

देशातील हिंदू समाज आता जागा झाला आहे. विनाकारण कोणत्याही पद्धतीचा अत्याचार सहन करणारा हिंदू समाज आता राहिलेला नाही, इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये आक्रोश मोर्चावेळी दिला.

बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अमानुष अत्याचाराविरोधात संविधान सन्मान मंचातर्फे रविवारी (दि.२५) खारघर येथे आक्रोश मोर्चा काढण्यात आला. देवाळेश्वर मैदानापासून सुरू झालेल्या आक्रोश मोर्चाचा हिरानंदानी टॅक्सी स्टँडजवळ समारोह झाला. या मोर्चामध्ये खारघर आणि तळोजामधील हजारो नागरिकांनी सहभागी होत बांगलादेशमध्ये हिंदूंवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आवाज उठवला.



या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस बिजेश पटेल, भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, माजी नगरसेवक नीलेश बाविस्कर, शत्रुघ्न काकडे, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, वासुदेव पाटील, किरण पाटील, विजय पाटील, वनिता पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, अमर उपाध्याय, किर्ती नवघर, गुरुनाथ गयकर, अ‍ॅड. राजेंद्र अग्रवाल, बीना गोगरी, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, मंडळ उपाध्यक्ष संजय घरत, उपाध्यक्ष अंकिता वारंग, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय लोखंडे, भरत कोंढाळकर, सुमित सहाय, अशोक जांगीड, तुकाराम कंठाळे, हार्दिक पटेल, वैभव शेजवळ, प्रवीण बेरा, चिटणीस आदित्य हातगे, प्रथम पाटील, सिमा खडसे, गजे सिंह, रामकुमार चौधरी, दीपक ठाकूर, निर्मला यादव, शुभ पाटील, गिरीश गुप्ता, रूपेश चवाण, प्रिया दलवी, भाग्यश्री खरपुरिया, स्मिता आचार्य, सुशीला शर्मा, गायत्री महापात्रा, नवीन हेगडे, श्यामला, मधुमिता जेना, योगींद्र कोट्टरी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीडित समरीनच्या कुटुंबियांची सय्यद अकबर यांनी घेतली भेट

### न्याय मिळवून देण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाकडे आग्रही मागणी



**पनवेल : वार्ताहर**

तळेगाव दाभाडे येथील समरीन नेवरेकर आणि तिच्या दोन मुलांच्या निर्घृण हत्या प्रकरणात अद्यापही मृतदेह ताब्यात न मिळाल्याने तिच्या कुटुंबीयांमध्ये अस्वस्थता आहे. या कुटुंबियांची भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांनी भेट घेऊन सांत्वन केले आणि दोषींना कठोर शासन केल्याशिवाय शांत बसणार नाही, असे आश्वासन दिले.

तळेगाव दाभाडे येथील समरीन निसार नेवरेकर ही तिची मुले ईशांत आणि इजान यांच्यासह बेपत्ता झाल्याची तक्रार तिचे वडील गुलाम कादर मोहम्मद हनीफ यांनी केली होती, परंतु या प्रकरणांमध्ये पीडितेला विवाहबाह्य संबंधातून गरोदर करणारा नराधम गजेंद्र दगडखैर आणि त्याचा साथीदार रविकांत गायकवाड यांनी समरीन, इजात आणि ईशांत यांची हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. तूर्तास तळेगाव दाभाडे पोलिसांनी या दोघांना अटक केली असल्याचे समजते, परंतु मृत तरुणी व तिच्या लहान मुलांचे मृतदेह अद्याप सापडलेले नाहीत.

या पार्श्वभूमीवर सय्यद अकबर यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष जनाब प्यारे खान यांना या प्रकरणांमध्ये जातीने लक्ष घालण्याचे निवेदन दिले आहे, तसेच समरीन नेवरेकरचे वडिलांसोबत बैठकदेखील निश्चित केली आहे.

सय्यद अकबर म्हणाले की, झालेला प्रकार अत्यंत निंदनीय आहे. दोन चिमुरड्या जीवांची कत्तल करताना ज्या सैतानांचे हात कापले नाहीत. अशा नराधमांना कठोर शासन झालेच पाहिजे. मी अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांच्यासमवेत पीडित कुटुंबाची भेट घालून देणार आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये ज्या पद्धतीचे पोलीस तपासाचे काम झाले आहे, त्यात संशयाला जागा आहे, असे नमूद केले. शकील काझी यांनी, शेवटच्या श्वासापर्यंत समरीन नेवरेकरच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन, असे सांगितले तसेच त्यांच्यासमवेत आदिल पटेल, माजी प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्यांक मोर्चा भाजप व शाहिद खान, शिवसेना अल्पसंख्याक महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष उपस्थित होते.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक विभागात दहीहंडी उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी दहीहंडीचे पूजन केले. या वेळी छोटा शिशू व मोठा शिशूच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोपालकाला सण साजरा केला. विद्यार्थ्यांना दही-पोहे व फळे यांचा प्रसाद देण्यात आला.**

## रिक्षाचालकाकडून बालिकेवर अत्याचार; पोलिसांकडून नराधमाचा शोध सुरू

**पनवेल** : बदलापूर शाळेतील अत्याचाराच्या घटनेनंतर पनवेलमध्ये दोन महिन्यांपूर्वी घडलेल्या अशाच एका प्रकरणाला वाचा फुटली असून पोलीस अत्याचारी रिक्षाचालकाचा शोध घेत आहेत.

२१ ते २२ जूनदरम्यान ही घटना पळस्पे फाटा येथील खासगी संकुलाच्या एका वाहनतळात ही घटना घडली. विशेष म्हणजे खासगी विकासकाने बांधलेल्या या महागृहनिर्माणाची सुरक्षा व्यवस्था चोख असल्याचा दावा केला जात होता. पळस्पे फाटा येथील पारपुंड येथील २५ वर्षीय रिक्षाचालकाने त्याच्या ओळखीच्या १३ वर्षाच्या बालिकेला २१ जूनच्या रात्री आजिवली गावाजवळून रिक्षात जबरदस्तीने बसवून पळस्पे फाटा येथील एका इमारतीच्या वाहनतळात घेऊन जाऊन तेथेच तिच्यावर अत्याचार केल्याचे पोलिसांना पीडितेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

पीडित बालिकेला दुसऱ्या दिवशी सकाळी रिक्षाचालकाने घरी सोडले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात संबंधित रिक्षाचालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितिन ठाकरे यांनी या गंभीर प्रकरणात लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियमाप्रमाणे गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## निवडक

### महिलांसाठी सेल्फ डिफेन्स उपक्रम

**उरण** : दिवसेंदिवस महिलांवर होणारे अत्याचारामुळे महिलांना स्वसंरक्षणची गरज असून या अनुषंगाने



एआयओसीडी, एमएससीडीए संघटनेचे ऑल इंडिया प्रेसिडेंट अप्पासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हाध्यक्ष लीलाधर पाटील, रायगड सेक्रेटरी प्रवीण नावानंदार यांच्या मार्गदर्शनाखाली उलवे येथे सेल्फ डिफेन्स कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. वहाळ ग्रामपंचायत सदस्य तथा भाजप युवा नेते वितेश म्हात्रे, दीपिका म्हात्रे, कींडर गार्डन प्रिंसिपल ऋचा सिंग यांचे सहकार्य या कार्यक्रमाला लाभले. व्हॉइस प्रेसिडेंट किरण जाधव, प्रिया पवार, शर्वरी पवार, आशा चव्हाण, चांदणी शेख, गोविंद जाधव, रणजित मिश्रा,वर्षा चासकर,शकुंतला लोधी,श्रीनिधी पाटील यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मार्शल आर्ट्स अनिकेत जाधव, प्रतीक भेंग्रा आणि त्यांच्या टीमने महिलांना मार्गदर्शन केले.

### उरण-पनवेल मार्गावरील खड्डे भरले



**उरण** : पावसामुळे उरण-पनवेल मार्गावरील बोकडवीरा ते नवघर पुलादरम्यान खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याची दखल घेत सध्या बोकडवीरा, वायू विद्युत केंद्र कामगार वसाहत आदी ठिकाणच्या मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम सिडकोकडून सुरू करण्यात आले आहे. हे खड्डे भरण्यासाठी पेव्हरब्लॉकचा वापर केला जात आहे. अशाच प्रकारचे काम वीर वाजेकर महाविद्यालय तसेच नवघर उड्डाणपूल तेथेही करण्यात आले आहे.

### मिरची गल्ली परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : शहरातील मिरची गल्ली परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशी वाढलेली, बांधा सडपातळ, उंची अंदाजे पाच फूट असून अंगात पिवळी हाफ टी-शर्ट व काळी पॅन्ट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांजुर्णे (८४२२९११४२८) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ओरिएंटेशन कार्यक्रम





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ११वी विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा ओरिएंटेशन प्रोग्राम २३ व २६ ऑगस्टला उत्साही वातावरणात पार पडला.

ओरिएंटेशन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विद्यालयाचे नियम, शिस्त, अभ्यासक्रम याबद्दल माहिती दिली गेली. त्याचप्रमाणे विद्यालयातील विविध प्रकल्प, शैक्षणिक उपक्रम, वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा याचीही माहिती देण्यात आली. विद्यालयामध्ये ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला केले जाते जेणेकरून नव्या विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन होऊ शकते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत तसेच सचिव डॉ. एस. टी. गडदे हे होते. त्याचबरोबर इरशाद शेख, जयदास तेलवणे, सचिन वासकर, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्या निशा नायर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाकरीता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : इनरव्हिल क्लब ऑफ पनवेलतर्फे दोन दिवसाच्या फंड रेसिंग मॉन्सून एक्झिबिशनमध्ये प्लास्टिक आणि ई-वेस्ट आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. अ‍ॅड. सुनिता जोशी यांच्या केएसआर मेमोरियल ट्रस्टच्या सुबोध निर्मलला जमा करण्यात आला. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, पल्लवी पाटील, यमुना प्रकाशन, किरण सी. आदी उपस्थित होते.**

## स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात; विजेत्यांना पारितोषिक

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचा १०वा वर्धापन दिन सोहळा आणि गुरूपौर्णिमा उत्सव तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विविध स्पर्धामध्ये यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. स्वरसंस्कार विद्यालयामधून प्रथम संगीत विशारद पदवी प्राप्त करण्याऱ्या सुनिता भुजबळ यांचाही सत्कार करण्यात आला.



स्वरसंस्कार विद्यालयामध्ये संगीत विशारद सुरेखा भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १० वर्षे शास्त्रीय, उपशास्त्रीय व सुगम संगीताचे तसेच तबला, पेटी, गिटार वादनाचे क्लासेस घेतले जातात.

स्वरसंस्कार विद्यालयामध्ये गेल्या वर्षीपासून भरतनाट्यम् आणि पाश्चात्य नृत्यशैलीचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा, व्यक्तिमत्त्व आणखी विकसित व्हावे आणि रंगमंच सादरीकरण उत्तमोत्तम व्हावे या हेतूने असे उपक्रम स्वरसंस्कार संगीत विद्यालयात नेहमी राबवले जातात.

स्वरसंस्कार विद्यालयाच्या संचालिका अ‍ॅड. सुरेखा भुजबळ या गेली २२ वर्षे संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. मेलोडी मेकर्ससह विविध नामांकीत वाद्यवृंदांच्या माध्यमातून तसेच सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध पार्श्वगायकांसमवेत त्यांनी देशभरात गायनाचे कार्यक्रम केले आहेत. त्यांना अनेक राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

पनवेल येथील ज्येष्ठ नागरीक सभागृह येथे शनिवारी (दि. २४) वर्धापन दिन सोहळा आणि गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी अजय भाटवडेकर, सुधीर कांडपिळे, तृप्ती जितेश पाटील, राहुल सोनावणे, गणेश भगत, श्रीनिवास काजरेकर, रवी नाईक, अ‍ॅड. प्रीती मनोज भुजबळ उपस्थित होते.

कार्यक्रमाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने झाला. त्या वेळी गणेशवंदना आणि वैष्णव जन तो तेणे कहिए हे भजन सादर केले. कोलकत्ता येथे घडलेल्या अमानुष घटनेमधील महिला डॉक्टरला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यालयामधून प्रथम संगीत विशारद पदवी प्राप्त करण्याऱ्या सुनिता भुजबळ यांचाही सत्कार करण्यात आला.

## राज्यपाल हरिभाऊ बागडेंकडून दीपक पाटील यांचे कौतुक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष चौक वावरले येथील दिपक पाटील यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दीपक पाटील यांचे कौतुक केले व फाउंडेशनच्या पुढील कामास शुभेच्छा दिल्या. या वेळी दिपक पाटील यांच्यासोबत पाथर्डी मतदारसंघाचे भावी आमदार गोकुळ दौंड, माजी सभापती कानसा वारणा फाउंडेशन ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष माने, रायगड जिल्हा युवा अध्यक्ष विजय अहिरे, मराठा समाजाचे समवयक विजय काकडे आणि संभाजीनगर एसटी डेपोचे मॅनेजर राजू पवार उपस्थित होते.

## संपादकीय

# दूरदृष्टी दर्शवणारी योजना

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय रविवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ही योजना मार्च २०२४पासून लागू असणार आहे. या निर्णयाचा राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना फायदा होणार असून विरोधक मात्र तरीही निवडणुकांवर डोळा ठेवून विरोधाचीच भूमिका घेत आहेत.

**केंद्राने नुकत्याच जाहीर केलेल्या युनिफाइड पेन्शन स्कीम अर्थात यूपीएस या योजनेनुसार सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेळी असलेल्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळणार आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांना शनिवारी ही सुधारित पेन्शन योजना लागू झाली. याच पार्श्वभूमीवर राज्यानेही निर्णय घेतला. देशातील तरुणांची संख्या मोठी असल्याने येत्या दोनएक दशकांमध्ये विकसित भारत घडविण्याच्या दिशेने भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार जोरदार प्रयत्न करते आहे. २०१४पासूनच केंद्र सरकार त्या दिशेने प्रयत्नशील आहे. त्यासोबतच देशातील वृद्ध नागरिकांसाठी सुरक्षित सेवानिवृत्ती निश्चित करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. केवळ सरकारी कर्मचारीच नव्हे तर असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन, तर कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी अटल पेन्शन योजना सरकारने यापूर्वीच सुरू केल्या आहेत, पण विरोधकांनी मात्र सरकारच्या प्रयत्नांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत निव्वळ विरोधासाठी विरोध करण्याचा अजेंडाच राबवला आहे. केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या युनिफाइड पेन्शन स्कीम अर्थात यूपीएसमुळे देशभरातील २३ लाख केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना लाभ होईल. काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांवर डोळा ठेवून केंद्र सरकारने या योजनेची घोषणा केल्याची टीका विशेषत: काँग्रेस पक्षाकडून केली जाते आहे. निवडणुकांच्या तोंडावर सरकारी कर्मचाऱ्यांचा रोष परवडणार नसल्याने राज्य सरकारनेही केंद्राप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतला अशी टीकाही विरोधक करत आहेत. वास्तवत: केंद्र व राज्य सरकारने केलेली या योजनेची घोषणा अत्यंत स्वागतार्हच असून समाजातील एका मोठ्या वर्गाला निवृत्तीनंतरची आर्थिक सुरक्षितता यातून मिळणार आहे. स्वाभाविकपणे काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला याचा लाभ मिळूही शकतो. त्यामुळेच विरोधक अस्वस्थ झाले आहेत. अन्य विकसित देशांप्रमाणेच सामाजिक सुरक्षा वाढवण्याच्या दृष्टीने आपल्या देशातही प्रयत्न व्हायला हवेत असे एकीकडे म्हणायचे आणि सरकारने त्या दिशेने नव्याने काही योजना आणल्यास त्याला 'लोकानुनय' संबोधायचे हा विरोधी पक्षांकडून केला जाणारा दुटप्पीपणा नाही तर त्याला काय म्हणायचे? देशातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे हे सरकारचे कामच आहे. मोदी सरकार त्या दृष्टीने कुठल्याही एका वर्गाची नव्हे तर समाजातील विविध घटकांची काळजी वाहते आहे. अनेक कल्याणकारी योजना सरकारने गेल्या दशकभराच्या आपल्या सत्ताकाळात आणल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि जन-धन योजना यांचा या संदर्भात विशेष उल्लेख करावा लागेल. सध्याच्या निवृत्तीवेतनात कर्मचाऱ्यांचा वाटा १० टक्के आहे तर केंद्र सरकारचा वाटा १४ टक्के आहे. आता यूपीएसमध्ये केंद्र सरकारचा हिस्सा १८ टक्के असणार आहे. यूपीएसमध्ये आधीच्या राष्ट्रीय पेन्शन योजनेतील काही त्रुटी दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केंद्र सरकारने केला आहे. येत्या काळात देशातील वृद्ध लोकसंख्येत वाढ होणार आहे. त्या दृष्टीनेही आखलेल्या या योजनेत केंद्र सरकारची दूरदृष्टीच दिसून येते हे विरोधकांनाही मान्य करावे लागेल.**

# भगवान कृष्णाचा आवडता गोपाळकाला

जन्माष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. दहीहंडी आणि कृष्णजन्माष्टमी यांच्या निमित्ताने हा प्रसाद तयार केला जातो. कृष्ण जयंती व्यतिरिक्त वर्षभरात जेव्हाजेव्हा काल्याचे कीर्तन होते तेव्हा तेव्हा त्या कीर्तनानंतर गोपाळकाला होतो. म्हणूनच त्या कीर्तनाला काल्याचे कीर्तन म्हणतात. ज्ञानेश्वरीचे किंवा दासबोधाचे पारायण, किंवा अनेक दिवस चालणाऱ्या अशाच एखाद्या ग्रंथवाचनानंतर अथवा कीर्तन महोत्सवामध्ये शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन होते. वारकरी संप्रदायात वारीची सांगता गोपाळकाला करूनच होते.



कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषत: कोकणात या उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो व त्याचे सेवन करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे आला । गोकुळात आनंद झाला ।। असे गाणे गात अनके लहानथोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात. या दिवशी महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत, उंच मडक्यात दही-दुधाने भरलेला हंडा ठेवून तेथपर्यंत मानवी मनोऱ्यावरून पोहचून तो हंडा फोडण्याचा गोविंदा हा साहसी खेळ होतो. हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्योत्सव आहे. श्रीकृष्णाने व्रज मंडळात गाई चारताना आपण व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्य पदार्थांचा काला केला व सर्वांसह त्याचे भक्षण केले अशी कथा आहे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे.

गोपाळ म्हणजे गायीचे पालन करणाऱ्या कृष्णाच्या या जन्मोत्सवाच्या निमित्ताने काल्याचा प्रसाद केला जातो. काला म्हणजे एकत्र मिळविणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजविलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी घालून केलेला एक खाद्यपदार्थ. हा कृष्णास फार प्रिय होता असे मानले जाते. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व वाटून खात असत असे मानले जाते.

गोपाळकाला हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रातिनिधीत्व करतो. काल्यातील प्रमुख घटक पोहे, दही, दूध, ताक व लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत.

पोहे : वस्तूनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक (काहीही झाले तरी श्रीकृष्णाला धरून ठेवणारे सवंगडी)

दही : वात्सल्यभावातून प्रसंगी शिक्षा करणार्या मातृभक्तीचे प्रतीक

दूध : गोपींच्या सहज सगुण मधुराभक्तीचे प्रतीक

ताक : गोपींच्या विरोधभक्तीचे प्रतीक

लोणी : सर्वांच्या श्रीकृष्णावरील अवीट प्रेमाच्या निर्गुणभक्तीचे प्रतीक

या दिवशी ब्रह्मांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्त्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

इतर फायदे

शरीर व मन यांना पोषक : या दिवशी वायुमंडल आपतत्त्वाने भारीत असल्याने देहातील पंचप्राणांच्या वहनाला पोषक असल्याने मनाला उत्साह देणारे व देहाची कार्यक्षमता वाढवणारे असते.

सर्व सृष्टीच आनंदी असणे : वायुमंडलातील आर्द्रतेचे प्रमाण वाढल्याने वृक्षचरही चैतन्ययुक्त लहरी ग्रहण व प्रक्षेपण करण्यात अत्यंत संवेदनशील बनल्याने सर्व सृष्टीच आनंदी असते.

# द ग्रेट खली अर्थात दिलीप सिंह राणा



खली जागतील अनेक दिग्गज पहेलवानांना वर्ल्ड रेसलिंग इंटरटेनमेंटच्या (डब्ल्यूडब्ल्यूई) रिंगमध्ये धूळ चारणारा भारताचा सर्वात शक्तिशाली पैलवान आहे. दलीप सिंह राणाचा (द ग्रेट खली) जन्म २७ ऑगस्ट १९७२ रोजी हिमाचल प्रदेशच्या धिराना या गावी झाला. त्याच्या वडिलांचे नाव ज्वाला आणि आईचे नाव तांदीदेवी. प्रोफेशनल रेसलिंगमधून निवृत्ती घेतल्यानंतर खली पत्नी हरमिंदर कौरसह भारतात राहत आहे. या निमित्ताने आम्ही आपल्याला त्याच्या जीवनाशी संबंधित काही रोचक गोष्टी सांगत आहोत.

दिलीप सिंह राणा हे भारतीय, व्यवसायिक कुस्ती लढणारे कुस्तीचे खेळाडू आहेत. त्यांना त्यांच्या डब्ल्यूडब्ल्यूईमधील 'द ग्रेट खली' या नावाने ते जगविख्यात आहेत. २००७मध्ये डब्ल्यूडब्ल्यूईत ते वर्ल्ड हेविवेट चॅम्पियन झाले होते.

दिलीप यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. सात भावंडापैकी ते एक होते. त्यांच्या वडिलांचे नाव ज्वाला सिंह व त्यांच्या आईचे नाव तांदीदेवी होते. दिलीपचा जन्म हिंदू कुटुंबात झाला. गरिबीच्या परिस्थितीमुळे त्यांना लहानपणीच छोटे मोठे मजदूरी काम करावे लागले. त्यांना गाईगेंटिजम आजार झाला. यामुळे त्यांची उंची खूप वाढली. पुढे एका ठिकाणी सिक्युरिटी गार्ड म्हणून असताना. त्यांना एका पोलीस अधिकाऱ्याने त्यांचा उंचीमुळे पंजाब पोलिसात नोकरी दिली

दिलीप सिंह राणा यांचा २७ फेब्रुवारी २००२ रोजी हरमिंदर यांच्याशी विवाह झाला. दिलीप-हरमिंदर यांना एक कन्या आहे. आता दिलीप यांना पूर्ण विश्व ओळखते. त्या दिलीपचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला, परंतु आपल्या अथक प्रयत्नांनी ते विश्वविख्यात कुस्ती खेळाडू बनले.

दिलीप सिंह राणाला, द ग्रेट खली हे नाव डब्ल्यूडब्ल्यूईने दिले. खली डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये अनेक मोठ्या पैलवानांविरुद्ध लढला. जसे ट्रीपल एच, जॉन सिना, केन, बिग शो इत्यादी. २००७मध्ये २० माणसांच्या बेटल रॉयल मॅचमध्ये त्यांनी सर्वांना पछाडत वर्ल्ड हेविवेट चॅम्पियनशिपवर आपले नाव कोरले. भारतातून डब्ल्यूडब्ल्यूईत जाणारा दिलीप सिंह राणा हा पहिला पैलवान होता.

खलीने जगभरात प्रसिद्ध असलेल्या डब्ल्यूडब्ल्यूई रेसलर 'हल्क हॉगन', जॉन सीना, 'द रॉक' अशा अनेत रेसलर्ससह काम केले आहे. 'डब्ल्यूडब्ल्यूई' ला राणासाठी नवे नाव शोधायला फार मेहनत करावी लागली. कुणी त्याला 'जायंटसिंह' म्हटले. तर कुणी 'भीम' नावाने संबोधले.

पेंग्विन प्रकाशनचे द म्यान हु बिकेम खली हे पुस्तक दिलीप सिंह राणा यांच्यावर लिहिले आहे. अशा या खलीची ओळख एव्हाना संपूर्ण जगभर असून रेसलिंगविश्वात त्याची क्रेझ आहे. **(साभार : इंटरनेट)**






## व्हॉट्सॲपच्या व्हॉइस मेसेजचे टेक्स्टमध्ये रूपांतर करणारे फीचर

व्हॉट्सॲप युजर्स बऱ्याच दिवसांपासून व्हॉट्सॲप Voice Note Transcriptsची वाट पाहत होते. अखेर हे फीचर अँड्रॉईड युजर्ससाठी रोलआउट करण्यात आलं आहे. कंपनी युजर्सच्या सोयीची पूर्ण काळजी घेते, त्यामुळे व्हॉट्सप मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले आहे. युजर्ससाठी वेळोवेळी नवनवीन फीचर आणली जातात, आता हे नवीन फीचर यूजर्ससाठी ॲपमध्ये ॲड करण्यात आले आहे.

व्हॉट्सॲपवर व्हॉईस मेसेज पाठवण्याचे फीचर अशा लोकांना खूप आवडतं, ज्यांना टाइप करणे फारसे आवडत नाही. जर तुम्हालाही व्हॉट्सपवर येणारे सर्व व्हॉईस मेसेज ऐकावं लागत असेल, तर आता यापुढे ते व्हॉइस मेसेज टेक्स्टमध्ये रूपांतरित करून वाचू शकता.

हे व्हॉट्सॲपचे नवीन फीचर आहे, जे तुमच्यासाठी हे काम अगदी सहज करेल. तुम्हाला हे फीचर व्हॉट्सॲप चॅट्समध्ये मिळेल आणि तुम्ही व्हॉट्सप सेटिंग्जमधून हे फीचर सुरू करू शकता. हे फीचर ऑन केल्यानंतर तुम्हाला हे फीचर चॅट्समध्ये व्हॉइस मेसेजच्या खाली दिसू लागेल.


या फीचरवर क्लिक करताच व्हॉट्सॲप तुमच्या सोयीसाठी टेक्स्ट फाइल डाउनलोड करेल. फाइलचा आकार सुमारे ९० एमबी असू शकतो. तुम्हाला फाइलच्या खालीच टेक्स्ट दिसू लागेल. गोपनीयता लक्षात घेऊन आणखी एक व्यवस्था करण्यात आली आहे आणि ती म्हणजे ही मजकूर फाईल कोणाशीही शेअर करता येणार नाही.

**लक्षात असू द्या...**

व्हॉट्सॲप Transcribe Feature सध्या फोनसाठी काम करत आहे, याचा अर्थ तुम्ही सध्या वेब व्हर्जनवर या फीचरचा वापर करू शकणार नाही. याशिवाय, हे फीचर सुरुवातीला इंग्रजी, स्पॅनिश, पोर्तुगीज, हिंदी आणि रशियन अशा पाच वेगवेगळ्या भाषांमध्ये उपलब्ध आहे. व्हॉट्सॲपवरील तुमचे सर्व वैयक्तिक व्हॉइस मेसेज एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड आहेत. मेसेज पाठवणारा आणि रिसीव्हरशिवाय कोणीही ऐकू शकत नाही, अगदी व्हॉट्सॲपसुद्धा नाही.

# लेखक, नाटककार नारायण धारप

नारायण गोपाळ धारप हे मराठी भाषेतील लेखक, नाटककार होते. प्रामुख्याने भयकथा, गूढकथांकरता यांची ख्याती आहे. यांनी निर्मिलेले समर्थ हे काल्पनिक पात्र आणि त्यावर आधारित गूढकथा विशेष गाजल्या. आज त्यांचा जन्मदिन आहे. धारपांचा जन्म ऑगस्ट २७, इ.स. १९२५ रोजी झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून रसायनशास्त्रात बी.एस्सी.टेक पदवी मिळवली.



**निमित्त**

धारप नोकरीनिमित्त काही काळ आफ्रिकेत वास्तव्यास होते. त्यांनी मराठीत १००हून अधिक पुस्तके लिहिली, प्रामुख्याने भयपट प्रकारातील. धारप यांच्या अनेक कादंबऱ्या आणि कथा स्टीफन किंगसह समकालीन अमेरिकन लेखकांकडून प्रेरित आहेत. शपथ ही किंगच्या IT आणि Gramma (नंतर तुंबाड (चित्रपट) बनलेली)द्वारे प्रेरित कथा होती. नारायण धारप हे एचपी लव्हक्राफ्टचे चतुल्हू मराठी वाचकांसाठी आणणारे पहिले मराठी लेखक होते.

समर्थ, आप्पा जोशी, कृष्णचंद्र, पंत आणि जयदेव या त्यांच्या कथा किंवा कादंबऱ्यांमध्ये अनेकदा आढळणारी मुख्य पात्रे आहेत. वेगवेगळ्या कथादेखील आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक नायक/नायिका असू शकतात ज्यांनी परिस्थितीवर मात केली, कधीकधी थोड्या बाह्य मदतीसह, कधीकधी त्याशिवाय. त्याच्या बहुतेक कथा चांगल्या आणि वाईट यांच्यातील एक महान लढाई दर्शवतात, सहसा चांगल्या विजयाने समाप्त होतात. धारप यांच्या काही कथा आणि स्टीफन किंग यांच्या कथांमध्ये काही साम्य आढळते. संदर्भ हवा तथापि, धारप यांच्या कथा मराठी संस्कृती आणि मराठी वाचकांकडून आल्याचे दिसते, त्यामुळे कथानक आणि भूगोल या क्षेत्रामध्ये काही कथांमध्येच साम्य दिसून येते. मराठी साहित्यात इतर प्रकारच्या लेखनाकडे ज्या आदराने पाहिलं जातं तसं अजूनही भयपट लेखनाकडे पाहिलं जात नाही. नारायण धारप बहुतेक मराठी वाचकांना आवडतात ज्यांना हॉरर प्रकारात काही रस आहे. त्यांनी काही खास मौलिक कथांवर आधारित लेखन केले मराठीतील विचित्र कथा, तसेच त्यांनी प्रथमच मराठी भयपट साहित्यात काल्पनिक पौराणिक कथा सादर केल्या.

धारप यांच्या पुस्तकांच्या सामान्य वैशिष्ट्यांमध्ये वाईटावर चांगल्याचा विजय, पुस्तकातील संकल्पनांची उत्पत्ती मराठी संस्कृतीतून, कथेला कोणत्याही प्रकारच्या लैंगिक संदर्भांपासून दूर ठेवणे (कोणत्याही गोष्टींमध्ये हा महत्त्वाचा घटक मानला जातो) लोकप्रिय हॉरर किंवा सस्पेन्स साहित्य), पुस्तके भयपट शैलीची असूनही, सामग्रीला 'चांगल्या अभिरुची' विरुद्ध कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा गुन्ह्यापासून दूर ठेवणे.

१८ ऑगस्ट २००८ रोजी वयाच्या ८२ वर्षी त्यांचा मृत्यू झाला. विधाता महावीर आर्य हा त्यांनी अखेरच्या काळात लिहिलेला कथासंग्रह होता. २०११मध्ये त्यांच्या अनोळखी दिशा या कादंबरीवर आधारित याच नावाची मालिका स्टार प्रवाह वाहिनीवर प्रदर्शित झाली होती. त्यांच्या कथेवरील ग्रहण ही मालिकाही खूप गाजली.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : राजपुरी परिसरात कोळी बांधवाच्या बोटी उभ्या आहेत. नारळीपौर्णिमेनंतर मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला तरी सततचा पाऊस, वादळी परिस्थिती आणि खवळलेला समुद्र यामुळे कोळी बांधव चिंतेत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

## लहान मुलांमध्ये मंकीपॉक्सचा धोका अधिक, लक्षणे ओळखा

एमपॉक्सला मंकीपॉक्सदेखील म्हणतात. या आजाराचा पहिला रुग्ण आफ्रिकेच्या भागात आढळला. मंकीपॉक्समुळे शरीरात अनेक प्रकारची लक्षणे दिसून येतात. प्रौढांव्यतिरिक्त, मंकीपॉक्सचा परिणाम मुलांवरही होत आहे. हा विषाणू केवळ आफ्रिकेतच नाही तर जगभरातील अनेक देशांमध्ये वेगाने पसरत आहे. मंकीपॉक्सची सुरुवातीची लक्षणे शरीरावर चेचकसारखी दिसतात. मंकीपॉक्सची लागण झाल्यानंतर, रुग्णांना सर्दीसह तापासारखी लक्षणे जाणवतात. याशिवाय लहान मुलांमध्येही अनेक लक्षणे दिसू शकतात. त्याकडे लक्ष दिल्यास मुलांवर वेळेवर उपचार सुरू करता येतात.



लहान मुलांमध्ये मंकीपॉक्सच्या लक्षणांबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

मंकीपॉक्स प्रथम कुठे पसरला? मंकीपॉक्स सर्वाधिक प्रकरणे आफ्रिकेत पाहिली जात आहेत, मात्र त्याचे रुग्ण जगातील इतर देशांमध्येही पाहायला मिळत आहेत. २०२१च्या उन्हाळ्यात नायजेरियाहून युनायटेड स्टेट्सला सहलीला गेले होते. काही दिवसांनंतर तेथे मंकीपॉक्सचे एक प्रकरण दिसले आणि काही काळ गेल्यानंतर हा उद्रेक अमेरिका, युरोप आणि आफ्रिकेबाहेरील भागात पसरला.

मुलांना जास्त धोका : मंकीपॉक्स कोणालाही होऊ शकतो, परंतु नवजात आणि लहान मुलांना संसर्ग होण्याचा धोका अधिक असतो कारण त्यांच्या शरीराची प्रतिकारशक्ती कमी असते. यामुळे पालकांनी मुलांबाबत अधिक सावध राहण्याची गरज आहे.

मुलांमध्ये मंकीपॉक्सची लक्षणे? थंडी वाजून ताप येण्याव्यतिरिक्त, मंकीपॉक्सची इतर अनेक लक्षणे मुलांमध्ये दिसू शकतात, जसे की- वारंवार आजारी पडणे, भूक न लागणे, अचानक जलद वजन कमी होणे, शरीरातील अति थकव्यामुळे मूल सक्रिय होत नाही, मुले वारंवार डोकेदुखीची तक्रार करतात, वारंवार येणारा ताप, अचानक पोटदुखी, उलट्या, अतिसार त्वचेवर चेचक सारखे पुरळ दिसणे इत्यादी.

संरक्षण कसे करावे : आजारी जनावराच्या संपर्कात कोणीही येऊ नये, व्हायरसने दूषित वस्तूंच्या संपर्कात येणे टाळा, मांस पूर्णपणे शिजवलेले खा, साबणाने वारंवार हात धुवा, ज्यांना आधीच या आजाराची लागण झाली आहे अशा लोकांना टाळा, आपण लोकांमध्ये जाताना तोंड आणि नाक झाकण्यासाठी मास्क वापरला पाहिजे, वारंवार स्पर्श केलेल्या पृष्ठभागांची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण, आधीच व्हायरसने संक्रमित व्यक्तीची काळजी घेत असताना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे वापरणे आवश्यक आहे.

## निवडक



### मारूतीरायाचा पालखी सोहळा

**रेवदंडा** : रेवदंड्याचे आराध्यदैवत श्री मारूतीरायाची पालखी सोहळा मोठ्या उत्साहात झाला. यानिमित्त आमदार महेंद्र दळवी यांनी उपस्थित राहून पालखी सोहळयात सहभाग घेतला. भजनी सप्ताहाचे समाप्तीनंतर दुसऱ्या दिवशी श्री मारूतीरायाचा पालखी सोहळा आयोजित करण्यात येतो. ढोलताशा, भगवी पताका व भजने याने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले. रेवदंडा श्री मारूती मंदिरातून पालखी सोहळ्यास सुरुवात झाली. सुतार आळी, भैवनाथ मंदिर, नारायण आळी, विठोबा आळी, बाजारपेठ, हरेश्वर मंदिरमार्गे पुन्हा श्री मारूती मंदिर असे मार्गक्रमण करीत पालखी सोहळ्याची सांगता झाली.

### सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**नागोठणे** : नागोठणे शहर व विभाग नाभिक समाजाच्या वतीने सालाबाद प्रमाणे श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी शुक्रवारी (दि.३०) मुख्य मार्गदर्शक भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त कळस पुजन, संत सेवा मंडळ नागोठणे पंचक्रोशी यांचे भजन, हभप नरेश महाराज जाधव पेण यांचे प्रवचन, विद्यार्थी गुणगौरव समारंभ, महाप्रसाद, महिलांचे विविध कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती मंडळाने दिली आहे.

### कर्जतमध्ये विविध दहीहंडी उत्सव

**कर्जत** : शहरात मंगळवारी (दि.२७) दोन मोठ्या दहीहंडी बांधण्यात येत असून या सोहळ्यात अनेक प्रसिद्ध तारेतारकांची उपस्थिती असणार आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून शिवसेना आणि आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी दहीहंडी उत्सव आयोजित केला आहे. कर्जत तालुका मर्यादित आणि खुला गट अशा दोन स्वरूपात हा उत्सव साजरा होणार आहे. खुल्या गटासाठी एक लाख २५ हजाराचे तर कर्जत तालुका गटासाठी एक लाख ११ हजारांचे बक्षिसे असणार आहे. त्याच वेळी सहा थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकाला १० हजाराचे रोख पारितोषिक दिले जाणार आहे. सिने अभिनेत्री क्रांती रेडकर, गायक राजा आदईकर यांच्यासह प्रसिद्ध यु ट्युबर विनायक माळी आणि रिल स्टार अक्षता पाटील, अपूर्वा पाटील यांची उपस्थिती असणार आहे.

# माणगावात कीडरोग शेतकऱ्यांची डोकेदुखी

## खोडकिड्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासन उतरले शेतात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात खरीप हंगामातील भातशेती चांगलीच तरारली आहे. हे पिक पूर्णतः निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. गेले आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खोडकिड्याचा प्रादूर्भाव भातशेतीवर दिसू लागला आहे. कीडरोगामुळे शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. खोडकिड्याचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून शासन शेतकऱ्यांच्या मदतीला शेतात उतरले आहे.



तालुक्यामध्ये मागील आठवड्यापासून पावसाने उघडीप दिल्यामुळे व तापमान जास्त असल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत कारण भात पिकावर खोड कीड्याचा प्रादूर्भाव तसेच सुरळीतील अळीचा प्रादूर्भाव झाल्याचे दिसून आले. त्यामुळे कृषि विभागाने शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली व मार्गदर्शन केले. तालुक्यातील खडकोली येथील सम्राट दगडू पवार व मंगरूळ येथील दत्ताराम शिंदे या शेतकऱ्यांच्या शेतावर क्षेत्रीय पाहणी केली. या वेळी कृषि विज्ञान केंद्र रोहा येथील शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर, कृषी संशोधन केंद्र रेपोली येथील डॉ. मनोज वाहने, तालुका कृषी अधिकारी अजय वगरे, गोरेगाव कृषी पर्यवेक्षक राजाराम मगर, कृषी सहाय्यक मंगरूळ अश्विनी जगताप, कृषी सहाय्यक ज्योती जाधवर तसेच महिला शेतकरी उपस्थित होत्या.

पिकावर पडलेल्या रोगावर औषध फवारणी करून पिकाचे संरक्षण कसे करायचे याबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये किडीचे एकच व्यवस्थापन करणे गरजेचे असून जैविक पद्धतीने व रासायनिक कीटकनाशकांचा वापर करून नियंत्रण करता येते उदाहरणार्थ दाणेदार कीटकनाशक कारटप हायड्रोक्लोराइड चार टक्के दाणेदार १८.७५ किलो किंवा क्लोरेंटरेनोपॉल चार टक्के दाणेदार दहा किलो किंवा फिप्रोनील ०.३४. टक्के दाणेदार २०.८ किलो प्रतिहेक्टरी या प्रमाणात वापरावेत, तसेच पाण्यात विरघळणारे लिक्विड कीटकनाशके क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही १२५० मिली किंवा कारट्याप हायड्रो क्लोराइड ५० टक्के प्रवाही ६०० ग्रॅम किंवा असिपेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी ६२५ ग्रॅम किंवा लंबडासायलोट्रीन पाच टक्के प्रवाही ५०० मिली प्रति हेक्टरी या प्रमाणात फवारावे. यामुळे पिके वाचली जात असेल उत्पन्नावर परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जात आहे, तसेच सदर किडीच्या नियंत्रणासाठी व्यापक प्रसिद्धी देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या.

ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या कृषी वार्ताफलकवर जम्बो झेरॉक्स लावणे तसेच शेतकरी व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये कीड नियंत्रणाबाबतची माहिती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. जेथे कीड व रोगाचा प्रादूर्भाव दिसून येईल तेथील शेतकऱ्यांनी कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुरूडमध्ये महसूल विभागामार्फत आदिवासी बांधवांसाठी विशेष उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

महसूल विभागामार्फत व आदिम जमातीच्या कातकरी विकासाकरिता प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत कुणे आदिवासीवाडी तलाठी सजा मल्याण येथे राबविण्यात आली.



कार्यक्रमांतर्गत आदिवासी बांधवांना आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, जातीचे दाखले, सिकल सेल स्क्रिनींग, वनपट्ट्यांना मंजुरी देणे, शिष्यवृत्ती, मातृत्व लाभ, किसान कार्ड, सन्मान निधी योजना योजनेचा लाभ देण्यात आला. कार्यक्रमासाठी सरपंच अजय नाईक, चौलचे मंडळ अधिकारी विजय मापुस्कर, तलाठी शितल म्हात्रे, तेजस्विनी काळे, वसुंधरा धुमाळ, आदिवासी प्रकल्प विभाग पेण क्रांतिकुमार पाटील, ग्रामसेवक शैलेश नाईक, मेडिकल ऑफिसर अलिबाग डॉ. श्रीकांत देशमुख, अमिषा गायकर, सुरेश दिवकर, सुविज्ञा कदम, आशासेविका समिधा राणे, एएनएम प्रणाली पेवेकर, औषध निर्माण अधिकारी श्रुती आमरे, कृषी सहाय्यक निलेश कवळे, कोतवाल विलास मोरे, सचिन पाटील, विष्णू पोसणे, महेंद्र नाईक व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

मंडळ अधिकारी विजय मापुस्कर यांनी, शासनाच्या योजना मागास वर्गीयांसाठी असून त्याचा जास्तीत जास्त फायदा लोकांनी घेतला पाहिजे. आदिवासी समाज डोंगराळ भागात राहतो. त्यामुळे त्याला मुख्य प्रवाहात आणणे खूप आवश्यक आहे. मागे न राहता विविध योजना जाणून घेऊन उचित फायदा घेण्याचे आवाहन केले.

# पेणमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतीदिनानिमित्त विविध स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतीदिन हा राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन म्हणून पाळला जातो. त्यानिमित्त यंदा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे पेण तालुक्यातील शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गीतकार, संवादलेखक आणि अभिनेते प्रा. डॉ. विनायक पवार, भूषण भोईर, प्रा. डॉ. आलम शेख, एन.जे.पाटील, समितीचे अध्यक्ष नितीन निकम उपस्थित होते. या वेळी प्रा. डॉ. विनायक पवार यांच्या हस्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर लिखित १५ पुस्तकाच्या संचाचे प्रकाशन करण्यात आले. तालुक्यातील वेगवेगळ्या शाळेतून निबंध स्पर्धेसाठी १२३ चित्रकलेसाठी ३५ आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी ३७ असे एकूण १९५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

वक्तृत्व स्पर्धेत प्रथम लक्षिता पाटील, द्वितीय श्रावणी शिंदे, तृतीय सेजल पाटील; चित्रकला स्पर्धा प्रथम रिद्धी ठाकूर, द्वितीय रिद्धी मनोहर, तृतीय चैतन्य म्हात्रे; निबंध स्पर्धेत प्रथम कार्तिकी पाटील, द्वितीय समिधा ठाकूर, तृतीय आयुष पाटील या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुस्तके आणि शालेय उपोयोगी वस्तू भेट म्हणून देण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून नितीन निकम, नंदकिशोर परब आणि सतीश पोरे यांनी परीक्षण केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना सावनी गोडबोले यांनी तर सूत्रसंचालन जगदीश डंगर यांनी केले. शेवटी आभार संदेश गायकवाड यांनी मानले.



# रोहा रेल्वेस्थानकात जलद गाड्यांसाठी प्रयत्न करणार –खासदार तटकरे

## पडम येथे फ्लायओव्हरचे भूमिपूजन आणि शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचे वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे आल्यानंतर कोकण रेल्वेच्या या मार्गावरून दिवसभरात ५०पेक्षा जास्त रेल्वे गाड्या धावू लागल्या. त्यामुळे पडम व अष्टमी दोन्ही ठिकाणी असलेले रेल्वे फाटकांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. यासाठी उड्डाणपुलाच्या कामासाठी ९० कोटींचे निधी आपण आणू शकलो. हे काम वर्षभरात पूर्ण होणार आहे. रोह्याला अधिकाधिक जलद गाड्यांना थांबे देण्यासाठी आपण रेल्वे मंत्री वैष्णव यांना निवेदन दिले आहे, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी खारापटी येथे व्यक्त केले.



महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालय यांच्या संयुक्त उपक्रम रोहा तालुक्यातील नागोठणे-रोहा मार्गावरील पडम रेल्वे क्रॉसिंग क्रमांक ५२ येथे फ्लायओव्हरचे भूमिपूजन व खारापटी पडम या गावातील एमआयडीसी धाटाव यांच्या दूषित पाण्याने बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे चेकवाटप प्रसंगी खारापटी येथे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी सभापती राजेश्री पोकळे, रामचंद्र सकपाळ, नंदकुमार म्हात्रे, जयवंतराव पोकळे, अप्पा देशमुख, राजेंद्र पोकळे, संदिप चोरगे, नवनीत डोलकर, उत्तम नाईक, नथुराम तांडेल, मंगेश चोरगे, विभा चोरगे आदी उपस्थित होते.

रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्रीकांत यांनी, रोहेकरांचा त्रास कमी करण्यासाठी या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करणार असल्याचे सांगितले.

राजेंद्र पोकळे यांनी, खारापटी येथून रोहाकडे जात असताना गेली ३० वर्षे पडम व अष्टमी रेल्वे फाटकाचा त्रास आम्हाला सहन करावा लागत आहे, परंतु खासदार सुनील तटकरे यांनी हा त्रास होऊ नये यासाठी त्यांनी उड्डाणपूल मंजूर केला आहे. याचबरोबर तीन कोटी ९४ लाख रु. नुकसानभरपाई खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांना मिळाल्याचे सांगितले. सूत्रसंचलन रवी दिघे यांनी तर आभार अरुणेश चोरगे यांनी मानले.


**अर्जंट पाहिजेत**

**पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.**

**संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४**


### ग्रुप ग्रामपंचायत रासळ

ता. सुधागड जि. रायगड

**निविदा सूचना**

ग्रामपंचायत रासळ ता. सुधागड जि. रायगड यांज कडून खालील साहित्य व कामासाठी नोंदणी कृत ठेकेदारांकडून / पुरवठा दारांकडून जाहीरपणे निविदा दिनांक ०३/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधि/योजना | अंदाजित रक्कम | वस्तु पुरविण्याचा/ काम पुर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत रासळ हद्दीतील वावे येथील राजिप शाळा दुरुस्ती. | ग्रामपंचायत निधी | ७१,४९९/- | ३ महिने | |
| २ | ग्रुप ग्रामपंचायत रासळ हद्दीतील रासळ वावे आंबोले रासळ वाडी जोशी वाडी रामनगर शिल्पकार नगर वरची आदिवासी वाडी खालची आदीवासी वाडी कडे जाणाऱ्या रस्त्यांची गणपती सना पूर्वी ग्रिट व खडी ने खड्डे भरणे व रस्त्याच्या दुतर्फास साफ सफाई करणे. | ग्रामपंचायत निधी | २,००,०००/- | १५ दिवस | |
| ३ | ग्रुप ग्रामपंचायत रासळ हद्दीतील वावे येथील स्मशान भूमी दुरुस्ती करणे | १५ वित्त आयोग सन २०२४-२५ | १,५६,३२०/- | ०६ महिने | |
| ४ | ग्रुप ग्राम पं. रासळ हद्दीतील भरत अधिकारी घरा पासून ते वरची आदीवासीवाडी कडे जाणारा गटार तयार करणे | १५ वित्त आयोग सन २०२४-२५ | १,२०,०००/- | ०६ महिने | |
| ५ | स्वच्छता विषयक उपकरणे (निर्मळ कलश) व इतर स्वच्छता शी संबधित साहित्य पुरवणे | १५ वित्त आयोग सन २०२४-२५ | ५०,०००/- | ०१ महिना | |

१) सदर निविदा बाबत विस्तृत माहिती ग्रा. प कार्यालय रासळ येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२) साहित्य उत्तम दर्जाचे आय एस आय / आय एस ओ मार्क प्रमाणित असावे
३) सदर निविदा दि ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता दोन साक्षीदार समक्ष ग्राम पंचायत कार्यालय उघडणे येतील.
४) प्राधिकरण कोणतेही कारण न देता निविदा पैकी कोणतेही किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे
५) जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून दि ०३/०९/२०२४ पर्यंत पत्रके/निविदा कार्यालयीन वेळेत स्वीकारली जातील नंतर आलेल्या दरपत्रकेचा विचार केला जाणार नाही
६) उपलब्ध निधि नुससार पेमेंट करण्यात येईल.
७) करारनाम्या नुसार दरपत्रक कायम केल्यानंतर दरामध्ये बदल करता येणार नाहीत.
८) ठेकेदार हा जीएसटी/नोंदणीकृत ठेकेदार असावा.

दिनांक : २६/०८/२०२४

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत रासळ**

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत रासळ**

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.

**अग्निशमन विभाग**

**शुध्दीपत्रक १**

**कामाचे नाव :-** पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी ७० मीटर उंचीचे Aerial Ludder Platform बाहन खरेदी (०२ वर्ष स्टँडर्ड वॉरंटी व ०३ वर्ष CSMC सह ) खरेदी करणेकामी करणे.

**संदर्भ :-** ई-निविदा सुचना क्र. प.म.पा./अ.वि./२३२१/ प्र.क्र.७/२६२८/२०२४

| अ.क्र. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १ | ई-निविदा पुर्व बैठक (PriBid Meeting) | गुरुवार, दिनांक : २९/०८/२०२४ दुपारी १५.०० वाजता |

तसेच सदर निविदा सुचना क्र. प.म.पा./अ.वि./२३२१/प्र.क्र.७ /२६२८/२०२४ मध्ये इतर कोणतेही बदल नाही व सदर निविदे बाबतची अधिक माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त होईल.

**सही/-**
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

### कागदपत्रे हरविलेबाबत

मी, सुमा हरि नायर, १०४, चंद्र दर्शन स्थळ, प्लॉट नं. ३५, से.५, पोलीस चौकीजवळ, करंजाडे, पनवेल ४१०२०६. जि. रायगड

माझेकडून पनवेल शहरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. १६१९/२०२४, दिनांक ७/८/२०२४ रोजी केली नोंद आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. रिट्स् कार नं. MH46 P 1470 चे आरसी बुक

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८८२८२११४५६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक : २७/०८/२०२४

**सही/-**
**सुमा हरि नायर,**

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.

**-: जाहीर सूचना :-**

**विषय :-** सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ करीता तात्पूरत्या स्वरुपात उभारावयाचे मंडप/ स्टेज/कमानी इ. चे परवानगीबाबत.

**संदर्भ :-** जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उत्सव/सण साजरा करणाऱ्या संस्था/मंडळे/व्यक्ती यांना जाहीर आवाहन करणेत येते की, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, इत्यादी सार्वजनिक उत्सव तसेच विविध महापुरुषांच्या जयंती/पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजऱ्या केल्या जातात. याकरीता सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेज उभारणी/कमाणी उभारण्यासाठी विविध संस्था/मंडळे महापालिकेकडे अर्ज करीत असतात. सार्वजनिक उत्सव प्रसंगी काही मंडळे वाहतुकीच्या रस्त्यांत मंडपे उभारत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळे निर्माण होत असतात.

मा. उच्च न्यायालयात, जनहित याचिका क्र. १७३/२०१० जनहित याचिकेत दिलेल्या निर्देशानुसार मंडप /स्टेज/कमानी उभारणीसाठी परवानगी देण्याबाबत महानगरपालिकेने सविस्तर कार्यपध्दती (S.O.P) तयार केली आहे. या कार्यपध्दतीमध्ये संबंधित मंडळांना परवानगीसाठी http://pandal.maharts.com या वेबसाईटवर जाऊन खालील कागदपत्र स्कॅन करुन अपलोड करावयाचे आहे. अर्जाचा नमुना, विविध विभागांकडील ना हरकत दाखल्याचा नमुना तसेच परवानगी पत्राचा नमुना निश्चित केला आहे.

या संदर्भात कुठलाही उत्सव सुरु होण्यापुर्वी ३ आठवडे संबंधित व्यक्ती/संस्था यांनी http://pandal.maharts.com या वेबसाईटवर मंडप परवानगीचा अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल केल्यानंतर पोलीस, वाहतूक, अग्निशमन व बांधकाम या विभागांचे दाखले (NOC) प्राप्त झाल्यानंतर अनुज्ञेयता पडताळून पाहिल्यानंतरच परवानगी देण्यात येईल वा नाकारण्यात येईल. महत्वाचे म्हणजे कोणतेही उत्सव सुरु होण्यापुर्वी १० दिवस अगोदर परवानगी घेणे बंधनकारक आहे. मंडळाने, संस्थेने रस्त्यावर खड्डे केल्यास रक्कम रु.९ हजार प्रति चौ. मी. दंड वसूल करण्यात येईल. या सर्व बाबींचा कार्यपध्दतीमध्ये प्रामुख्याने समावेश आहे. अर्जासोबत खालील नमुद कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र अपलोड (Scan करुन Upload) करणे.
२) जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र अपलोड (Scan करुन Upload) करणे.
३) स्थळदर्शक नकाशा अपलोड (Scan करुन Upload) करणे.
४) टोल फ्री क्रमांक १८००-२२७-७०१, ७३०४०७३९८९ ई-मेल : panvelcorporation@gmail.com,
५) दुरध्वनी क्रमांक : ०२२-२७४५८०४०/४१/४२
६) व्हॉट्सअॅप क्रमांक व एस. एम. एस. सुविधा : ९७६९०१२०१२ व ध्वनी प्रदुषणसाठी स्थानिक पोलीस स्टेशन, वाहतुक व्यवस्थेकरीता - वाहतुक पोलीस शाखा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

संबंधित संस्था/ मंडळे/व्यक्ती यांना वरिल नियमांची माहिती व्हावी, या दृष्टीकोनातून सदर जाहीर सूचना प्रसिध्द करणेत येत आहे.

जा.क्र.पमपा/परवाना/जा.क्र./१३०८/२०२४
/ मुख्यालय विभाग,
दिनांक :- २६ /०८/२०२४

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### दहीहंडीसाठी उरणमध्ये आकर्षक मडकी



**उरण :** गोपाळकाला मंगळवारी (दि.२७) असल्याने या दिवशी सर्वत्र दहीहंडी लावल्या जातात. यासाठी लागणारी सुंदर, आकर्षक व विविध आकाराच्या हंडी उरण बाजारात दाखल झाल्या आहेत. राजपाल नाका, गांधी चौक येथे हंडी विक्रीस आल्या असून नागरिक या खरेदी करतांना दिसत आहेत. ५० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत किमतीच्या हंडी विकतो, असे मुळेखंड कुंभारवाडा येथील पूजा मांडेलकर व सुरेखा कुंभार यांनी सांगितले.

### पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश



**नवी मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन उबाठा गटाचे वाशी, सानपाडा, शिरवणे, नेरुळ येथील पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यात उपशहर प्रमुख विवेक सुतार, विभागप्रमुख जयवंत सुतार, उपविभाग प्रमुख नंदेश पाटील, शाखाप्रमुख सूर्यकांत पाटील, सुरेश जाधव, महिला विभाग संघटक सुजाता भोईर, शाखा संघटक सुरेखा भोईर, सारिका सुतार, वैशाली म्हात्रे, अनिता राठोड, उपविभाग प्रमुख हेमंत चोरगे, शाखाप्रमुख प्रणय तुडीलकर, रणजित घाडगे, विभाग अधिकारी युवासेना साई माने, सुनील पाटील आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी खंडागळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

### चिरनेरमध्ये विजेचा पोल कोसळला



**उरण :** तालुक्यातील चिरनेर मुळपाडा दाखोडी या ग्रामीण वसाहतीत उभारण्यात आलेला विजेचा खांब रविवारी (दि. २५) वादळी पावसामुळे कोसळला. त्यामुळे मूळपाडा दाखोडी वसाहतीमध्ये काळोखाचे साम्राज्य पसरले आहे. याबाबत सरपंच, उपसरपंचांनी चिरनेर महावितरण कार्यालयाच्या कनिष्ठ अभियंता वर्षा मगर यांच्याशी संपर्क साधून त्यांना घटनेची माहिती दिली, मात्र वर्षा मगर यांनी पोल उभा करण्यासाठी मटेरियल व कामगार उपलब्ध नसल्याचे कारण सांगितले. यानंतर दुसऱ्या दिवशी हा पोल दुरूस्त करण्यात आला. यामुळे एक दिवस मूळपाडा दाखोडी वसाहत अंधारात असून येथील नागरिकांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

# जेएनपीए-पळस्पे मार्गावरील खड्डे भरण्यास सुरुवात

## नागरिकांमधून समाधान व्यक्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरील जेएनपीए-पळस्पे मार्गावरील खड्डे युद्धपातळीवर महामार्गातील खड्डे भरले जात आहेत. सोमवारी (दि.२६) सकाळी या खड्डेभरण काम सुरू करण्यात आल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.


मुंबई-गोवा महामार्गावरील जेएनपीए-पळस्पे मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. यामुळे येथून नियमितपणे ये-जा करणाऱ्या कामगार, विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. अनेकदा या मार्गावरील खड्ड्यांमुळे दुचाकीचालकांचे अपघात झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. सोमवारी टी पॉईंट ते पळस्पे फाटा या तीन किमीच्या अंतरावर दोन जेसीबी व दोन ट्रॅक्टर आणि ७० ते ८० मजुरांच्या सहाय्याने हे खड्डे जेएनपीटी मार्ग ते पळस्पे फाटा या दरम्यान हे काम सुरू होते.



मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे अद्याप बुजवले न गेल्याने कोकणवासी प्रतीक्षेत आहेत. गणेशोत्सवाला ११ दिवस शिल्लक असताना मुख्यमंत्री शिंदे यांनी अचानक सोमवारचा पनवेल येथील पळस्पे फाटा ते सिंधुदूर्ग असा रस्त्याच्या कामाची स्थिती पाहण्यासाठी दौरा आखला. महामार्गावरील जेएनपीटी ते पळस्पे मार्गावरील टी पॉईंट ते पळस्पे फाटा या मार्ग आणि सेवा रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. त्यामुळे सोमवारी पनवेल महापालिकेने रस्ते स्वच्छ करण्यासाठी तसेच रस्त्याकडेला वाढलेले रान कापण्यासाठी मजूर नेमले होते, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कंत्राटदाराला या दरम्यानच्या सेवा रस्त्यावरील दिड ते एक फुटी खड्ड्यांमध्ये राडारोडा टाकण्यासाठी यंत्रणा कामाला लावली होती.

या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना अचानक सरकारी प्रशासनाने खड्ड्यांच्या घेतलेल्या दखलमुळे समाधान व्यक्त केले. दुपारी मजूर टी पॉईंट ते पळस्पे या मार्गावर खड्डे भरणे, राडारोडा टाकणे, वाढलेले गवत कापणे, पेव्हर ब्लॉक बसविणे अशी कामे करताना दिसत होते.

# नवीन पनवेल रेल्वेस्थानकाजवळ पाईपलाईन फुटून पाणी गेले वाया



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल रेल्वेस्टेशनजवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाण्याची पाईपलाईन फुटल्याने १० दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हजारो लीटर पाणी वाहून जात आहे. याबाबत अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाने तक्रार केली असता, आम्ही शटडाऊन घेऊ तेव्हा दुरूस्त करू, असे उत्तर देण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्रकाश विचारे यांनी दिली.

नवीन पनवेल सेक्टर १५मध्ये असलेल्या मयूर सोसायटीत रेल्वेरुळाजवळून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाण्याची पाईपलाईन जाते. ही पाईपलाईन जून असल्याने नेहमीच फुटत असते. दहा दिवसांपूर्वी ही लाईन फुटल्याने हजारो लीटर पाणी रोज वाहून जात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता कुळकर्णी यांचेकडे अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाने तक्रार केली, पण अद्याप त्यांनी कोणतीही दुरूस्ती केलेली नाही.

अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांनी त्याबाबत पुन्हा अभियंता कुळकर्णी यांचेकडे पुन्हा फोन लावून विचारणा केली असता, ज्या वेळी शटडाऊन असेल तेव्हा दुरुस्त करू, असे अनेक ठिकाण पाणी वाहून जात असते, असे उत्तर देण्यात आले.

## अवैध फेरीवाले आणि वाहनांवर कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नेरूळ विभागांतर्गत नेरूळ स्टेशन व सेक्टर २० येथील गुडविल कॉर्नर येथे पदपथावर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या तसेच बेवारसपणे वाहन पार्किंग करणारे तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या १५ हातगाडी, तीन टेम्पो व एक रिक्षा आदींवर कारवाई करण्यात आली.

जप्त केलेले सामान कोपरखैरणे क्षेपणभूमी येथे जमा करण्यात आलेले आहे. कारवाईसाठी अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचारी, १३ मजूर, तीन टोईंग, तीन पिकअप, एक आयशेर, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक उपस्थित होते.

# गेल्या सात महिन्यांपासून सुरक्षारक्षक पगाराच्या प्रतीक्षेत

**पनवेल : वार्ताहर**

पीडब्ल्यूडी आस्थापनेवर तैनात असलेल्या सुरक्षारक्षकांना मागील सहा ते सात महिन्यांपासून वेतन मिळत नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. लवकरात लवकर त्यांचे वेतन करण्यात यावे अशा प्रकारचे पत्र रायगड जिल्हा सुरक्षारक्षक व बांधकाम कामगार मजदूर युनियन यांच्यातर्फे सरचिटणीस विनायक गांधी यांनी रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळ खांदा कॉलनी यांना दिले आहे.

रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळांतर्गत असलेल्या पीडब्ल्यूडी आस्थापनेवर तैनात करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांना कामावर रुजू करून सहा-सात महिने झाले आहेत, मात्र या सुरक्षारक्षकांना आजतागायत केलेल्या कामाच्या वेतन रुपी मोबदला आस्थापनेकडून न झाल्यामुळे मंडळाकडून अदा करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या सुरक्षारक्षकांना कामावर येजा करण्यासाठी पैशांची चणचण भासू लागली आहे व त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, तरी या सुरक्षारक्षकांना मंडळाकडून निदान पाच महिन्याचे थकित वेतन लवकरात लवकर मिळावे जेणेकरून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल, अशा आशयाचे पत्र रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाला देण्यात आले आहे.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात दहीहंडीचा सोहळा उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गोकुळाष्टमी सोमवारी (दि.२६) उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना समारंभ आणि संस्कृती यांची ओळख व्हावी म्हणून विविध सण विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. गोकुळाष्टमी सण विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून साजरा केला. हा कार्यक्रम साजरा करण्याची संधी सांस्कृतिक विभाग प्रमुख व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी नववीच्या वर्गाकडे सोपविली होती.

विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माची गाणी सादर करून तसेच कृष्ण जन्माच्या कथा सांगून असत्यावर सत्याचा विजय, अन्यायावर न्यायाचा विजय या मूल्यांची रुजवणूक केली. विद्यालयातील शिक्षिका विशाखा गावंड, वेदांती म्हात्रे, पल्लवी पवार तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी दहीहंडी व श्रीकृष्ण प्रतिमेचे पूजन केले.

# पनवेलकर रमले नाट्यसंगीतात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


ज्येष्ठ नाटककार विद्याधर गोखले आणि ज्येष्ठ गायक व संगीतकार पंडित राम मराठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून पनवेल कल्चरल असोसिएशनने मंदारमाला या तीनअंकी संगीत नाटकाचा प्रयोग नुकताच येथील फडके नाट्यगृहात संस्थेच्या निधी संकलनासाठी आयोजित केला होता.

राम मराठे फाउंडेशनने पुनरुज्जीवीत करुन नव्या संचात रंगमंचावर आणलेल्या या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे, या नाटकात पं. राम मराठे यांची तिसरी पिढी भाग्येश आणि प्राजक्ता मराठे प्रमुख भूमिका करीत आहेत, तर पं. राम मराठे यांचेच सुपुत्र संजय मराठे आणि मुकुंद मराठे दिग्दर्शन करीत आहेत. भाग्येश मराठे, प्राजक्ता मराठे आणि सुधांशू सोमण यांनी सादर केलेल्या जय शंकरा गंगाधरा.., जयोस्तुते उषादेवते.., तारील हा तुज गिरीजाशंकर.., कोण असशी तू नकळे मजला.., सोहम हर डमरु बाजे.., हरी मेरो जीवन प्राण आधार.., बसंत की बहार आयी.. अशा लोकप्रिय गाण्यांना रसिकांनी भरभरुन दाद दिली. या गायक-अभिनेत्यांना ऑर्गनवर वरद सोहनी, व्हायोलिनवर मोहन पेंडसे, तबल्यावर धनंजय पुराणिक व मुकुंद मराठे आणि पखवाजवर विराज म्हात्रे यांची साथ लाभली. मकरंद पाध्ये, रमेश चांदणे यांच्या अभिनयालाही रसिकांनी दाद दिली. नाटकात चंद्रकला या नृत्यांगनेची भूमिका करणाऱ्या प्रिया टिपाले-देव यांनीही आपल्या बहारदार नृत्याने रसिकांची मने जिंकली.



**उलवे नोड :** वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, भाजपचे उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश महतो, अवनीश सिंह, प्रिया अडसूळ यांनी सिडको हेल्थ सेंटरला भेट देऊन डॉ. निवेदिता पाटील, सिडको इंजिनियर पोखरकर यांच्या चर्चा केली. डेंग्यू, मलेरियाचा फैलाव रोखण्यासाठी सिडको अधिकारी व डॉक्टरांची एक टीम डोर टू डोर सर्वेक्षण करणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांची दहीहंडी जल्लोषात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये दहीहंडीचा कार्यक्रम झाला. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे,सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत व अन्य मान्यवरांच्या हस्ते गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच माजी विजय घरत यांच्या वतीने विजेत्या विद्यार्थी गोविंदा पथकांना सन्मानचिन्ह व रोख रकमेची पारितोषिके प्रदान करण्यात आली. संगीताच्या तालावर पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी मुले व मुली असे गटनिहाय दहीहंडीसाठी थर करण्यात आले. यामध्ये इयत्ता दहावी (मुली) आणि दहावी (मुले) या दोन्ही वर्गातील गोविंदा पथक विजेते ठरले. माजी उपसरपंच विजय घरत यांच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपये रोख व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन मुले व मुलींच्या पथकांना गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. वेशभूषा, चित्रकला व हस्तकला स्पर्धेतील विजेत्यांना रोख रकमेची पारितोषिके वितरीत करण्यात आली. वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांच्या वतीने १००० रुपयांची पारितोषिके वितरीत करण्यात आली, तर हस्तकला स्पर्धेतील विजेत्यांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या.

चेअरमन अरुणशेठ भगत यांनी या वेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांनी विशेषतः मुलींनी ज्याप्रमाणे सराईत गोविंदा पथकांप्रमाणे थर लावून दहीहंडी जिंकली त्याचे विशेष कौतुक केले आणि या सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या सणाचे अतिशय यशस्वी आयोजन केल्याबद्दल विद्यालयाचे ही कौतुक केले.

राम प्रहर

## श्रावणधारा

### पाऊस..


त्याची द्यावयास वर्दी..
येती कृष्णमेघी थेंब..
आतुरले आसुसले..
सारे बीजातील कोंब..

वीज तोरण लावून..
मग बरसल्या सरी..
गंध मातीचा पसरे..
परसात बांधावरी..

ओलीचिंब भिजलेली..
गाते धरणी खुशीत..
हासे नांगराच्या संगे..
घेई बियाणे कुशीत..

दरी डोंगर भिजले..
वाहे पाणी खळाळून..
कडे कपारीवरून..
देई आनंदे झोकून..


ओथंबले पानपान..
चोहीकडे हिरवाई ..
आनंदली सृष्टी सारी..
मिरवत नवलाई..





संदीप जोशी

# रायगडात आज दहीहंडीचा थरथराट!



## पेणमध्ये ललित पाटील मित्र मंडळाची १ लाख ११ हजार १११ रुपयांची हंडी

**पेण : प्रतिनिधी**

जिल्हाभरात दहीहंडी उत्सव साजरा होत असताना पेणमध्येही मोठ्या जल्लोषात दहीहंडी साजरा करण्यात येतो. यामध्ये पेणकरांचे आकर्षण असलेली ललित पाटील मित्र मंडळाची दहीहंडी यंदाही जोरदारपणे होणार असून मुख्य १ लाख ११ हजार ११ रुपयांच्या बक्षिसाबरोबरच सलामी देणाऱ्या पथकास आकर्षक बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष युवा नेते ललित पाटील यांनी दिली.

या दहीहंडी उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी जि.प. सदस्य कौसल्या पाटील यांच्यासह माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित राहणार आहेत.

या दहीहंडी उत्सवासाठी पेण तालुक्याबरोबर रोहा, अलिबाग, उरण तसेच मुंबई येथूनही गोविंदा पथक हजेरी लावत असतात. गेली अनेक वर्षे हा दहीहंडी उत्सव सुरु असून मंडळाचे सदस्य विशेष परिश्रम घेऊन उत्सव अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडतात.

पुरुष गोविंदा पथकाबरोबर महिला गोविंदा पथकही येथे हजेरी लावता असल्यामुळे या दहीहंडीचा उत्साह द्विगुणित होतो. आपल्या भागातील दहीहंडीचा उत्साह आटपून तालुक्यातील व शहरातील नागरिक सायंकाळी ४ ते ९ वाजता पेण नगर परिषदेसमोर ललित पाटील मित्रमंडळाचा दहीहंडी उत्सव पाहण्यास आवर्जून हजेरी लावतात. यंदाही याचे नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे.

## रोह्यात सुनील तटकरे प्रतिष्ठानतर्फे २,२२,२२२ रुपयांची पारितोषिके

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने या वर्षी २ लाख २२ हजार २२२ रुपयांची दहीहंडी बांधण्यात येणार आहे. रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग येथे या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दहीहंडी उत्सवात पुरुष व महिला गोविंदा पथके सहभागी होणार आहेत. या भव्य दिव्य दहीहंडीचे आयोजन खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केले आहे. या कार्यक्रमास महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे उपस्थित राहणार आहेत. या दहीहंडीनिमित्ताने कलाविष्काराने भरलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दहीहंडी फोडण्यासाठी येणाऱ्या पुरुष गोविंदा पथकाने सहा थर लावल्यास ११,१११ रुपये, तर सात तर लावल्यास ३३,३३३ रुपये बक्षीस लावण्यात आले आहे. महिला गोविंदा पथकाने चार थर लावल्यास ७,७७७ व पाच थर लावल्यास ९,९९९ बक्षीस देण्यात येणार आहे.

दहीहंडी उत्सव यशस्वी करण्यासाठी माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## परळी येथील सामाजिक कार्यकर्त्या ॲड. आरती गुप्ता भाजपमध्ये दाखल

**सुधागड : रामप्रहर वृत्त**



सुधागड तालुक्यातील परळी येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा प्रसिद्ध वकील आरती गुप्ता यांनी रविवारी (दि. २५) भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे सुधागड तालुका महिला मोर्चा संघटनात्मक ताकद वाढणार आहे.

ॲड. आरती गुप्ता यांची महिला सुरक्षा, सशक्तीकरण आणि सबलीकरणावर रोखठोक आणि तितक्याच आक्रमक भूमिका मांडणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या तथा प्रथितयश वकिल म्हणून ओळख आहे.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास रायगड जि.प. च्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस विठ्ठल सिनकर, महिला मोर्चा सुधागड तालुका अध्यक्ष प्रणाली शेठ, ज्येष्ठ नेते अमोल देसाई, परळी ग्रामपंचायत सदस्य सविता पवार, अर्चना दुधाने, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेश दुधाने, सतीश पवार, कृष्णा राजपुरकर, रवींद्र कदम, नंदा कदम, विकास माने, मारुती लांगी, सुनील दुधाने, दशरथ दुधाने आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## अल्काईल अमाइन्स कंपनीकडून वडगाव शाळेला सुसज्ज कॉम्प्युटर लॅब

**चौक : प्रतिनिधी**

अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि. पाताळगंगा यांच्या सौजन्याने सीएसआर फंडातून वडगाव येथील जि.प. शाळेला १० संगणकाची सुसज्ज लॅब भेट देण्यात आली. या कक्षाचे उद्‌घाटन नुकतेच झाले.

या कार्यक्रमास अल्काईल अमाईन्स कंपनीच्या एचआर प्रमुख अर्चना माने, माजी सरपंच गौरी गडगे, केंद्र प्रमुख जे.पी. परदेशी, सीएसआर कन्सल्टंट रवींद्र ओंकार, मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, शिक्षणसेविका मयुरी धायगुडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष करुणा ठोंबरे, उपाध्यक्ष राजश्री जांभुळकर तसेच शाळा व्यवस्थापन सदस्य, स्वयंसेविका आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चालू वर्षापासून या शाळेत आठवीचाही वर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे आता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना या संगणकाचा लाभ घेता येईल, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी या वेळी सांगितले.

अल्काईल अमाईन्स कंपनीच्या अजून एका शैक्षणिक उपक्रमाचा भाग म्हणून सातवीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेला मंथन ठोंबरे, द्वितीय आर्या कोंडीलकर आणि तृतीय क्रमांकाच्या कृतिका गडगे या विद्यार्थ्यांना शालेय किट देऊन गौरवण्यात आले, तर या योगदानाबद्दल आणि वेळोवेळी मिळणाऱ्या सहकार्याबद्दल शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांनी कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले.



## भाजप दक्षिण रायगड जिल्हा चिटणीसपदी उमेश साटम

**माणगाव : प्रतिनिधी**



भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने दक्षिण रायगड जिल्हा चिटणीसपदी उमेश साटम यांची नियुक्ती नवनिर्वाचित राज्यसभा खासदार तथा पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी करून तशा आशयाचे नियुक्ती पत्र आपल्या सहीनिशी दिले आहे.

उमेश साटम हे माणगाव तालुक्यातील रातवड गावचे रहिवासी असून विविध क्षेत्रामध्ये ते झोकून देत काम करीत असतात. भाजपचे ते निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून तालुक्यात सर्वत्र ओळखले जातात. भाजपच्या ध्येय धोरणांशी प्रामाणिक राहत पक्षाच्या उन्नतीसाठी त्यांची नेहमीच आग्रही भूमिका राहिली आहे. माणगाव तालुका भाजपचे सरचिटणीस म्हणून त्यांनी सलग सहा वर्ष काम केले असून दोन वर्ष माणगाव तालुकाध्यक्ष म्हणूनही त्यांनी पक्षाचे कामकाज पहिले आहे. पक्षाचे काम करताना केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. त्याचबरोबर पक्षामार्फत विविध उपक्रम राबविण्यातही ते नेहमीच अग्रेसर असतात. विविध निवडणुकांमध्ये पक्षाच्या उमेदवारांना जास्तीतजास्त मतदान कसे होईल यासाठीही ते प्रयत्नशील असतात. नवमतदारांचे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी त्यांची नेहमीच धडपड असते. पक्ष नेतृत्वाने त्यांना बढती देऊन जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती केली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## अलिबागमध्ये शनिवारी मुलांमधील स्क्रीनटाईम विषयावर व्याख्यान

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील विद्यासन एज्युकेशनल फाउंडेशनतर्फे शनिवारी (दि. ३१) अलिबागेत मुलांमधील स्क्रीनटाईम या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या विषयावरील पुण्यातील प्रख्यात बालरोगतज्ज्ञ डॉ. वैशाली देशमुख पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. लहान मुलं ते किशोरवयीन मुलांचे पालक या कार्यक्रमाला उपस्थिती लावू शकतात.

३१ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजता आदर्श भवन, भाऊ जगे उद्यानासमोर, अलिबाग येथे हा कार्यक्रम होणार असून प्रवेश शुल्क ५० रुपये आहे.

फोन व टीव्हीच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये वाढणारा हट्टीपणा, चिडचिडपणा, त्यांच्या डोळ्यांवर आणि त्याहून वाईट मेंदूवर होणार परिणाम हे सगळं दुर्दैवाने आपण आपल्या आसपास पाहत आहोत किंवा पुढे कदाचित जास्त प्रमाणात पाहू. जेवताना मुलांच्या हातात मोबाईल किंवा समोर टीव्ही चालू ठेवणं, एका ठिकाणी शांत बसेल म्हणून मुलांच्या हातात मोबाईल देणं या गोष्टी कितपत योग्य आहेत? पुढे या सगळ्याचा मुलांच्या वागण्यावर व विकासावर काय व कितपत परिणाम होणार आहे? या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी नोंदणी अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी (७०३८७६८३३१), (९९६०१६०४१९) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## रेवदंडा-चौलमध्ये शिवस्मारक उभारण्याची मागणी



**रेवदंडा** : ऐतिहासिक व प्राचीन वारसा लाभलेल्या रेवदंडा-चौलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व्हावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे. यासाठी सोशल मीडिया निसर्ग ग्रुपसुद्धा आग्रही असून सरपंच प्रफुल्ल मोरे यांना रेवदंडा-चौलमध्ये शिवरायांचे स्मारक व्हावे यासाठी ग्रामपंचायत हद्दीत जागा उपलब्ध करावी, अशा मागणीचे निवेदन त्यांनी दिले. निवेदन देतेवेळी ग्रुपचे ॲडमिन राकेश काठे व कल्पेश नाईक व अन्य सदस्य उपस्थित होते. सरपंच मोरे यांनी निश्चित प्रयत्न करेन, अशी ग्वाही दिली.

# लोणेरे विद्यापीठात जागतिक उद्योजक दिन साजरा; मान्यवरांची उपस्थिती

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ फोरम ऑफ इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲण्ड एंटरप्राइझमार्फत दरवर्षीप्रमाणे यंदाही जागतिक उद्योजक दिवस हा उद्योजकता, नवकल्पना आणि नेतृत्वाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्रा. डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप आणि उद्योजकतेबाबत जागरुकता निर्माण करून नवचेतना व स्फूर्ती निर्माण होऊन त्यांच्याकडील नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारित स्टार्टअप उद्योजकतेकडे कल वाढवा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास पदांतरा टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अवनीश मिढा, ईआरओ पॉवरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वंदना बांगर-येर्माळकर, विद्यापीठ इनक्युबेशन सेंटरचे अधिष्ठाता (शैक्षणिक) व संचालक, डॉ. संजय नलबलवार, डीबीएटीयू फोरम ऑफ इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲड एंटरप्राइझचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



डॉ. संजय नलबलवार यांनी प्रास्ताविकात इनक्युबेशन सेंटरमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबांबत माहिती दिली तसेच भविष्यात विविध उपक्रमाद्वारे इनक्युबेशन सेंटर अधिकाधिक स्टार्टअप उद्योग निर्मितीसाठी काम करेल, असे सांगितले.

वंदना बांगर-येर्माळकर यांनी सहभागींना जागतिक उद्योजक दिनानिमित्त शुभेच्छा देताना उद्योग उभारणीत येणाऱ्या विविध समस्यांना सामोरे जाऊन यशस्वी उद्योजक कसे व्हावे याबद्दल मार्गदर्शन केले.

अवनीश मिढा यांनी सहभागींना मार्गदर्शन करताना समाजातील विविध क्षेत्रातील अडचणी जाणून त्याला परिणामकारक समाधान शोधून स्टार्टअप सुरू करावे आणि नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणारे व्हा, असे आवाहन केले. या वेळी मिधा यांनी केवळ संधी शोधण्यापेक्षा संधी निर्माण करण्याकडे मानसिकता बदलण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उद्योजक केवळ आर्थिक वाढीसाठीच योगदान देत नाहीत तर समाजात परिवर्तन घडवून आणणारे उपाय सादर करून सामाजिक आव्हानांना सामोरे जावून समाधान देण्याचे काम करतात, असे मतही त्यांनी मांडले.

या कार्यक्रमास १५०पेक्षा अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेधावी आवले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. नविन खंडारे यांनी मानले.

## पारदर्शकतेमुळे यशोधन पतसंस्थेची स्थिती चांगली -गिरीश तुळपुळे

**अलिबाग : वार्ताहर**



पतसंस्था सुरू करणे सोपे आहे, पण ती टिकवणे, निष्ठेने चालवणे, विश्वास निर्माण करणे कठीण आहे. अलिबाग तालुक्यातील यशोधन नागरी सहकारी पतसंस्था पारदर्शक कामामुळे आपली पत राखून आहे, असे कौतुकास्पद उद्‌गार कोकण विभाग पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी काढले.

यशोधन पतसंस्थेची २२वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच अलिबागमधील काँग्रेस भुवनच्या सभागृहात पार पडली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून गिरीश तुळपुळे बोलत होते. सभेस यशोधन पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर वागळे, उपाध्यक्ष मन्सूर सय्यद, सेक्रटरी पराग पोवळे, संचालक गणेश चांदोरकर, सचिन पितळे, डॉ. राजेंद्र चांदोरकर आणि इतर संचालक उपस्थित होते.

स्वाती मयेकर, ॲड. उत्तरा मयेकर या भगिनींनी मुसळधार पावसात गर्भवती महिलेची धीराने रिक्षात प्रसूती करून बाळ- बाळंतिणीचे प्राण वाचवले. त्याबद्दल यशोधन पतसंस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

संदीप गोठीवरेकर यांनी अहवाल वाचन केले. ॲड. राकेश कोसमकर यांनी कायदेशीर सल्लागार म्हणून आपले मनोगत व्यक्त केले. यशोधन पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर वागळे यांनी आपल्या भाषणात पतसंस्थेच्या वाटचालीवर प्रकाश टाकला. सभेचे सूत्रसंचालन भाग्यश्री वाळंज यांनी केले.

## माथेरान रेल्वेगाडीचे टीसी विजय लांडगे यांचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान गाडीचे तिकीट तपासनीस विजय लांडगे यांच्या तत्पर कार्यप्रणालीची दखल घेऊन रेल्वे प्रशासनाने त्यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित केले आले.

विजय लांडगे हे १४ मे रोजी माथेरान-अमन लॉज शटल गाडीवर सेवा बजावत असताना माथेरानमध्ये अचानक वादळ होऊन मोठ्या प्रमाणात पाऊसही सुरू झाला. या वेळी रेल्वे रूळावर मोठ मोठी झाडे पडल्याने गाडी थांबवण्यात आली. गाडीतील प्रवाशी घाबरले होते, परंतु लांडगे यांनी गाडीतील प्रवाशांना धीर देऊन तुम्हाला सहीसलामत अमन लॉज स्टेशनला पोहचवू असा विश्वास दिला तसेच स्वतः रेल्वे रूळावर उतरून कर्मचाऱ्यांसह त्यांनी झाडाच्या फांद्या बाजूला करून मार्ग मोकळा केला व गाडी सुरक्षितपणे अमन लॉज स्टेशनवर पोहचवली. त्यांच्या कामाची दखल घेत मध्य रेल्वेचे वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक बी. अरुण यांनी त्यांना सन्मानित करून प्रशस्तीपत्र दिले.



## कला प्रचार, जतनासाठी मध्य रेल्वेचा पुढाकार; दोन शिल्पांचे अनावरण

**रोहे : प्रतिनिधी**



मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करन यादव यांनी रेल्वेच्या कलेचा प्रचार आणि जतन करण्याच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हेरिटेज इमारतीत दोन शिल्पांचे अनावरण केले.

कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी मध्य रेल्वेने आयोजित केलेल्या कला स्पर्धेची विजेती भारतीय कलाकार सोनाली अय्यंगार यांनी बनवलेल्या गणपती हे मुंबईचे मूलतत्व आणि हनुमान अर्थात कालातीततेचे प्रतीक या शिल्पांचे महाव्यवस्थापकांनी अनावरण केले.

कलाकाराचा सत्कार करताना श्री. यादव म्हणाले, हा एक उत्कृष्ट उपक्रम आहे आणि मध्य रेल्वे भारतीय कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी अशाच प्रकल्पांसाठी आणखी संभाव्य ठिकाणे शोधणार आहोत. या उपक्रमाद्वारे आम्हाला आशा आहे की, भारतीय कलाकारांना देशातील इतर ऐतिहासिक आणि प्रसिद्ध वास्तूंमध्ये त्यांचे कार्य भारत आणि परदेशातील लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी अशाच संधी उपलब्ध करून दिल्या जातील. या वेळी मध्य रेल्वेचे प्रधान विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



# रायगडच्या कराटेपटूंनी जिंकली चॅम्पियनशीप ट्रॉफी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

के.एस. वॉरियर्स ऑल स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने राज्यस्तरीय कराटे स्पर्धा पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोव्हायडरच्या खेळाडूंनी पाच सुवर्ण, १२ रौप्य आणि २८ कांस्यपदकांसह पहिली बिग चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावली.

स्पर्धेत चांगू काना ठाकूर (सीकेटी महाविद्यालय), एसएमडीएल महाविद्यालय तसेच स्मॉल वंडर्स स्कूल येथील एकूण ४६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत जवळपास २००हून अधिक खेळाडूंनी आपले क्रीडाकौशल्य दाखवले.

भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोव्हायडरचे खेळाडू वेदांत मोहिते, हर्षल कुंडलकर, राज शितोळे, यश मोरे, स्वराज इंगळे यांनी सुवर्ण; सारा घाडी, अक्षया बनसोडे, स्वरा पिसाळ, समीक्षा इंगळे, आर्यन साह, देवेश नवीन, अविर बनसोडे, अंश पगार, वेदांत शेटे, सार्थक पवळे, दक्ष पुण्या, असित इंगळे यांनी रौप्य; तर अनन्या कोरी, अशिता वालावलकर, आहाना सोलंकी, तीर्था शेट्टी, मृणाल वाढवळ, परिणीधी सिंग, निशा सरदार, अंजली साह, अन्वी मोरजकर, वृद्धी बिराजदार, जिया डोंगरे, श्वेता देवकते, समरजीत सिंग, निहार शिंदे, श्रेयश देवकते, वेदांत कुडके, प्रतीक अहिरवाडगी, सोहम इंगळे, ओम कोठावले, ध्रुव दिघाडे, स्वराज पाटील, यथार्थ सोनावणे, श्रवण पाटील, यशराज चव्हाण, राजवीर भोईटे, मित पाटील, रिजूल कुंडलकर, श्रेयश मडके यांनी कांस्यपदक जिंकले.

यशस्वी खेळाडूंना रायगडचे माजी खासदार तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, कळंबोलीतील एसएमडीएल कॉलेजच्या प्राचार्य प्रीती महाजन, स्मॉल वंडर स्कूलच्या प्राचार्य माधुरी संबोधी यांनी मार्शल आर्टला निरंतर साथ सहयोग दिल्यामुळे या खेळाला जिल्ह्यात व राज्यात स्थान मिळाले आहे.

भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोव्हायडरचे संस्थापक व इंडिया ब्लॅक बेल्ट असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य टेक्निकल डायरेक्टर भूपेंद्र गायकवाड, जे गेली २० वर्षे शेकडो मुले-मुली, महिला-पुरुष यांना आत्मसंरक्षण, जिमनॅस्टिक, मेडिटेशन, अस्त्र-शस्त्र या मार्शल आर्ट कलेचे प्रशिक्षण देत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट प्रशिक्षणामुळे खेळाडूंनी सुयश संपादन केले आहे.

## रायफल शूटिंग स्पर्धेत खेळाडूंचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात अवनी अलंकार कोळी हिने १० मिटर एअर पिस्टलमध्ये सुवर्ण, तर १४ वर्षाखालील गटात संस्कृती पवार हिने सुवर्ण व शिवम भोसले याने रौप्यपदक जिंकले. ही सर्व मुले इंडियन मॉडेल स्कूल आणि जुनियर कॉलेजचे विद्यार्थी आहेत, तर १४ वर्षाखालील गटात अर्णव अलंकार कोळी यानेही सुवर्णपदक पटकावले. अर्णव हा उरणच्या पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश स्कूल वेश्वी दिघोडे शाळेचा विद्यार्थी आहे.

या सर्वांची निवड मुंबई झोनल स्पर्धेसाठी झाली आहे. हे नेमबाज सिद्धांत रायफल व पिस्टल शूटिंग क्लबच्या इंडियन मॉडेल स्कूल व जुनिअर कॉलेजमध्ये असणाऱ्या शूटिंग रेंजमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण किशन खारके, अलंकार कोळी व विश्वजीत यांच्याकडे घेत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या प्रिन्सिपल गौरी शाह, पराडकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## द. आफ्रिका संघ पुन्हा ठरला 'चोकर्स'

### दुसऱ्या सामन्यासह मालिकाही गमावली

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा संघ हा क्रिकेटच्या मैदानातील सर्वोत्तम संघांपैकी एक आहे, पण मोठ्या स्पर्धेतील सातत्याने पदरी पडलेल्या अपयशाने त्यांना चोकर्सचा टॅग लागला आहे. आता छोट्या स्पर्धेतही त्यांनी चोकर्सवाली खेळी करून हातचा सामना गमावल्याचे चित्र पहायला मिळाले.

दक्षिण आफ्रिका संघ सध्या वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. कसोटी मालिका खिशात घातल्यानंतर टी-२० मालिकेत दक्षिण आफ्रिकेचा संघ अक्षरश: तोंडावर पडला. वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा सामना त्रिनिदाद टोबॅगो येथील ब्रायन लारा स्टेडियमवर खेळवण्यात आला. या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना यजमान वेस्ट इंडिज संघाने निर्धारित २० षटकात १७९ धावा केल्या होत्या. धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ १४९ धावांत ऑल आउट झाला.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने १३व्या षटकातील पाच चेंडूवर चौथी विकेट गमावली त्या वेळी त्यांची धावसंख्या १२९ होती, पण त्यानंतर विकेट मागून विकेट पडत राहिली. २० धावांत संघाने उर्वरित सहा विकेट गमावल्या. परिणामी त्यांना ३० धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवामुळे त्यांना तीन सामन्यांची टी-२० मालिका गमवावी लागली आहे.






### मुशफिकुरकडून बक्षिसाची रक्कम देशातील पूरग्रस्तांना

**कराची : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाने रावळपिंडी येथे पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ऐतिहासिक विजय मिळवला. या संस्मरणीय विजयात बांगलादेशचा अनुभवी खेळाडू मुशफिकुर रहीमने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने पहिल्या डावात १९१ धावांची शानदार खेळी करत बांगलादेशला १० विकेट्सने मोठा विजय मिळवून दिला. या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला सामनावीराचा किताब देण्यात आला. यानंतर त्याने मोठा निर्णय घेत चाहत्यांची मने जिंकली.

सामना संपल्यानंतर मुशफिकुर रहीमने आपल्या भावना व्यक्त करताना बक्षिसाची रक्कम बांगलादेशच्या पूरग्रस्तांना दान करण्याचा निर्णय घेतला. याबद्दल त्याचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.

## अखेर विनेश फोगटला मानद सुवर्णपदक

### हरियाणाच्या खाप पंचायतीने केला अनोखा गौरव

**चंदिगड : वृत्तसंस्था**

भारताची महिला कुस्तीपटू विनेश फोगटला ऑलिम्पिक व्यवस्थापनाने अधिक वजनामुळे अंतिम सामन्याच्या आधी अपात्र ठरवले होते. त्यामुळे तिचे सुवर्णपदक हुकले. त्यानंतर विनेशने क्रीडा लवादाकडे रौप्यपदक मिळावे, अशी मागणी केली होती, पण ती मागणी फेटाळण्यात आली. अखेर विनेश फोगटला तिचे वास्तव्य असणाऱ्या हरियाणातील खाप पंचायतीने मानद सुवर्णपदक देऊन सत्कार केला.

विनेशला सुवर्णपदक देण्याची घोषणा खाप पंचायतीने आधीच केली होती. त्यानुसार तिला पदक प्रदान करण्यात आले. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना विनेश म्हटले, मला आता मिळणाऱ्या या सन्मानासाठी मी कायम ऋणी राहीन. हा सन्मान इतर कोणत्याही पदकापेक्षा खूप मोठा आहे.



मी जेव्हा पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अंतिम सामन्यात खेळू शकले नाही तेव्हा मला वाटले की मी खूप दुर्दैवी आहे, पण भारतात परत आल्यानंतर ज्या प्रकारे माझे स्वागत झाले, मला लोकांचे प्रेम आणि पाठिंबा मिळाला ते पाहता मला वाटतंय मी खूप सुदैवी आहे. अशा पाठिंब्यामुळे इतर महिला खेळाडूंचाही आत्मविश्वास वाढेल, असेही विनेशने नमूद केले.

५० किलो वजनी गटात विनेश फोगट ऑलिम्पिकमध्ये खेळत होती. उत्तम कामगिरी करून तिनं अंतिम फेरीही गाठली, मात्र अंतिम फेरीआधी केलेल्या वजनाच्या चाचणीमध्ये विनेशला अपात्र ठरवण्यात आले. कारण विनेशचे वजन फक्त १०० ग्रॅम जास्त भरले. या संदर्भात क्रीडा लवादाकडेही याचिका दाखल करण्यात आली. अंतिम सामन्यापर्यंत विनेश ५० किलो वजनाचे निकष पूर्ण करूनच पोहचली होती. त्यामुळे तिला रौप्यपदक देण्यात यावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली, मात्र लवादाने सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर ही मागणी फेटाळून लावली. अखेर पदकाविनाच विनेश फोगट भारतात परतली.

भारतात परतल्यानंतर विनेश फोगटचे जंगी स्वागत करण्यात आले. आधी दिल्ली विमानतळावर तिचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर हरियाणातील तिचे गाव बलालीपर्यंत विनेशची जंगी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी खाप पंचायतीचे सदस्य व विनेशचे चाहते मिरवणुकीत उपस्थित होते.

## रोहितने जागवल्या धवनसोबतच्या आठवणी



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा विश्वासार्ह सलामीवीर स्टार फलंदाज शिखर धवनने शनिवारी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार रोहित शर्मा आणि शिखर धवन सलामीची भारताची एक जबरदस्त जोडी आहे. रोहितने धवनच्या निवृत्तीबाबत पोस्टमध्ये दोघांचे एकापेक्षा एक कमाल फोटो शेअर केले आहेत आणि कॅप्शनही लक्ष वेधणारे आहे.

रोहित शर्माने शिखरचे पूर्वीपासूनचे काही फोटो पोस्ट शेअर केले आणि कॅप्शनमध्ये लिहिले की, 'रूम शेअर करण्यापासून ते मैदानावरील आयुष्यभराच्या आठवणी शेअर करण्यापर्यंत. तू नेहमीच दुसऱ्या टोकाला राहून माझं काम सोपं केलं आहेस. द अल्टीमेट जाट.'

शिखर धवन आणि रोहित शर्मा यांनी २०१३च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पहिल्यांदा एकत्र सलामी दिली होती. या दोघांनी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कार्डिफमध्ये १२७ धावांची भागीदारी केली होती. धवनने त्या सामन्यात पहिले एकदिवसीय शतक झळकावले, तर रोहितने ६५ धावांचे योगदान दिले. या दोघांची सर्वात उल्लेखनीय कामगिरी २०१८च्या आशिया कपमध्ये झाली, जिथे त्यांनी सुपर फोर सामन्यात पाकिस्तानविरुद्ध २१० धावा जोडल्या. धवन आणि रोहित या दोघांनीही त्या सामन्यात शतके ठोकल्याने भारताने ६३ चेंडू बाकी असताना नऊ विकेट्स गमावून विजय मिळवला.

धवन-रोहितची भागीदारी केवळ एका फॉरमॅटपुरती मर्यादित नव्हती. कसोटीत धवनने २०१३ मध्ये मोहालीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध शानदार पदार्पण करत १८७ धावा केल्या होत्या. या खेळीने त्या सामन्यात भारताच्या सहा विकेट्सने विजयाचा पाया रचला. आक्रमक शैलीसाठी ओळखला जाणारा धवनने अनेकदा आघाडी घेतली, तर रोहितने स्थिरता दिली. या संतुलनामुळे त्याला भारतीय संघाचा भक्कम पाया रचला.

### विराटचीही भावूक पोस्ट

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरसह अनेक क्रिकेटपटूंनी शिखर धवनच्या निवृत्तीवर प्रतिक्रिया दिल्या. आता भारताचा स्टार फलंदाज आणि धवनचा मित्र विराटने कोहलीनेही त्याच्यासाठी एक भावनिक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्याने धवनचे कौतुक केले असून त्याला भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.विराटने पोस्टमध्ये म्हटलेय की, शिखर तुझ्या जबरदस्त पदार्पणापासून ते भारताचा सर्वात विश्वासार्ह सलामीवीर बनण्यापर्यंत, तू आम्हाला जपण्यासारख्या असंख्य आठवणी दिल्या आहेस. तुझी खेळाबद्दलची आवड, खिलाडूवृत्ती आणि तुझी ट्रेडमार्क स्माईल या साऱ्या गोष्टींची खूप आठवण येणार आहे, पण तुझा वारसा कायम असणार आहे. आठवणी, अविस्मरणीय परफॉर्मन्स आणि नेहमी मनापासून नेतृत्व केल्याबद्दल धन्यवाद. गब्बर, तुझ्या मैदानाबाहेर पुढील इनिंग्ससाठी तुला शुभेच्छा!






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com